अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ०४ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १५५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## तिसऱ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा भारतावर सहज विजय



इंदूर : भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात इंदूरच्या होळकर स्टेडियमवर तिसरा कसोटी सामना पार पडला. उत्कृष्ट गोलंदाजी तसच संयमी फलंदाजीच्या जोरावर कांगारुंनी हा सामना सहज जिंकत ९ विकेट्सनी भारताला मात दिली आहे.

बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतील या विजयासह मालिकेतील ऑस्ट्रेलियाचं आव्हान कायम असून सद्यस्थिती भारत २ विजय तर ऑस्ट्रेलिया १ विजय अशी आहे. तिसऱ्या कसोटी सामन्यात गोलंदाजांचं वर्चस्व दिसून आलं. पहिल्या डावात भारत केवळ १०९ धावांत सर्वबाद झाला. ज्यानंतर पहिल्या दिवशी एकूण ४ आणि दुसऱ्या दिवशीचा खेळ सुरु झाल्यावर उर्वरीत ६ विकेट्स घेत भारताने १९७ धावांत ऑस्ट्रेलियाला रोखलं. ज्यानंतर ८८ धावांची पिछाडी घेऊन मैदानात उतरलेला भारत १६३ धावाच करु शकला. पुजाराच्या ५९ धावांमुळे भारताने किमान इतकी धावसंख्या केली. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाकडून नॅथन लायनने तब्बल ८ तर मिचेल स्टार्क आणि मॅथ्यू कुहनेमनने प्रत्येकी एक विकेट घेतली. त्यानंतर तिसऱ्या दिवशी ७६ धावाचं माफक लक्ष्य पार करण्यासाठी मैदानात उतरलेल्या ऑस्ट्रेलियाने केवळ १ विकेट गमावत ट्रॅव्हिस हेडच्या नाबाद ४९ आणि लाबुशेनच्या नाबाद २८ धावांच्या जोरावर सामना जिंकला.


# खुषखबर
# दोन महिन्यात ३० हजार शिक्षकांची भरती होणार

✔ सुराज्य/सोलापूर

**खुषखबर...खुषखबर... गेल्या काही वर्षांपासून रखडलेली शिक्षक भरती आता पुन्हा सुरू होणार आहे. राज्याचा शिक्षण विभाग सध्या या भरतीच्या तयारीत गुंतला आहे. पुढील दोन महिन्यात पहिल्या टप्प्यात तब्बल ३० हजार शिक्षकांची भरती होणार आहे. ही माहिती खुद्द शिक्षणमंत्री दीपक केसरकर आणि ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी विधिमंडळात दिली आहे. त्यामुळे इच्छुकांनो, आता लागा तयारीला, द्या परीक्षा, व्हा पास आणि बना शिक्षक.**

गेल्या काही वर्षांपासून राज्याच्या शिक्षण विभागाने शिक्षकांची भरतीच केली नाही. अनेक विद्यार्थी डीएड आणि बीएड करून भरतीच्या प्रतीक्षेत बसून आहेत. दुसरीकडे मोठ्या प्रमाणात शिक्षक सेवानिवृत्त झाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शिक्षकांच्या जागा रिकाम्या झाल्या. मात्र भरती अभावी त्या जागा रिक्तच राहिल्या आहेत. परिणामी आहे त्या शिक्षकांवरच अतिरिक्त भार पडला आहे. तरीही सरकार शिक्षक भरती काढण्याचे नाव घेत नव्हते. त्यामुळे डीएड/बीएड धारकांमध्ये सरकारविषयी कमालीची नाराजी पसरली होती.

राज्यातील मराठी शाळांची अवस्था बिकट आहे. पटसंख्या अभावी अनेक ठिकाणी शाळा बंद होत आहेत. पात्रता धारक शिक्षक उपलब्ध असूनही गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षक भरती होत नव्हती. परंतु, आता लवकरच राज्यात तीस हजार शिक्षकांच्या पदांची भरती होणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी देखील काल विधानसभेत एका लेखी प्रश्नाचे उत्तर देताना याबाबत माहिती दिली होती. त्यानंतर आज मंत्री गिरीश महाजन यांनी सभागृहात याबाबतची माहिती दिली.






### एकही शाळा बंद होणार नाही


२० आणि त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यात येणार नाहीत. २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे सर्वेक्षण करण्यात आल्यामुळे सरकार या शाळा बंद करणार, असा अनेकांचा समज झाला. मात्र, ज्या शाळेत एक विद्यार्थी असेल, त्याला त्या ठिकाणी योग्य शैक्षणिक वातावरण मिळू शकेल का? हा मुद्दा आहे. त्यामुळे मुलांच्या हिताचा विचार करावा लागणार आहे. दर्जेदार शिक्षण देणे ही सरकारची प्राथमिकता असल्याचे मंत्री दीपक केसरकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

### तारांकित प्रश्न अन् सरकारला जाग

दरम्यान आ. राजेश एकडे आणि अन्य सदस्यांनी शिक्षक भरतीसंदर्भात विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. ० ते २० पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यास होत असलेला विरोध, डीएड/बीएड धारकांची वाढलेली बेरोजगारी, सेवानिवृत्त शिक्षकांच्या नेमणुकीमुळे बेरोजगार तरुणांमध्ये वाढलेला असंतोष असे अनेक उपप्रश्न यावेळी उपस्थित झाले. या प्रश्नांना लेखी उत्तर देताना शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी राज्यात ३० हजार शिक्षकांची पदे भरती जातील, अशी माहिती दिली.

### गेल्या वर्षीही दिले होते आश्वासन

मागच्या वर्षी डिसेंबर महिन्यात शिक्षणमंत्री केसरकर यांनी विधानसभेत ३० हजार शिक्षकांची भरती करणार असल्याचे आश्वासन दिले होते. अर्थ खात्याने शिक्षकांच्या ८० टक्के भरतीला मंजुरी दिली असून त्यापैकी ५० टक्के पदे तातडीने भरण्यात येणार असल्याची घोषणा केसरकरांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. त्यानंतर ग्रामविकास मंत्री गिरिश महाजन यांनीही हीच माहिती अधिवेशनात दिल्यामुळे यंदा भरती होईल, अशी आशा इच्छुकांमध्ये निर्माण झाली आहे.



## एकादशीनिमित्त विठ्ठल मंदिरातील द्राक्ष फळांची सजावट झाली गायब

### विठ्ठलाच्या गाभाऱ्यातच द्राक्षावर मारला डल्ला

पंढरपूर : एकादशीनिमित्त पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरामध्ये द्राक्ष फळांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. या सजावटीसाठी सुमारे एक टन द्राक्ष वापरण्यात आले होते. मात्र सकाळी द्राक्ष सजावट झाल्यावर काही तासातच सारी द्राक्ष सजावट गायब झाली. भाविकांनी ह्या द्राक्षांवर डल्ला मारला असल्याचा संशय व्यक्त होत आहे. याबाबत मंदिर प्रशासनाकडून भाविक द्राक्ष घेऊन गेले आहेत, असे सांगितले जात आहे.

त्यामुळे पांडुरंगाच्या दारातील सजावट गायब झाल्याने सामान्य भाविकांतून हळहळ व्यक्त होत आहे. मंदिरातील द्राक्ष सजावटीचे फोटो व्हायरल झाल्यावर अनेक भाविक मंदिरात आले. मात्र मंदिरात भाविकांना ही सजावट न पाहता आल्यामुळे हिरमोड झाला. मंदिरातील फळाच्या सजावटीसाठी वापरण्यात आलेली फळे दुसऱ्या दिवशी भाविकांना वाटण्यात येतात.मात्र यंदा पहिल्याच दिवशी द्राक्षांवर डल्ला मारण्यात आला आहे.

दरम्यान, शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षयमहाराज भोसले यांनी भाविकांची भूमिका लक्षात घेत मंदिर प्रशासनाला थेट प्रश्न विचारत सीसीटीव्ही फुटेज द्वारे खुलासा करण्याचे आवाहन केले आहे. याबाबत मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याविषयावर बोलण्यास नकार दिला.

## हौदात पडल्याने तीन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

✔ सुराज्य/पंढरपूर

घरासमोरील हौदामध्ये पडल्यामुळे तीन वर्षीय बालिकेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना तालुक्यातील देगाव येथे घडली. या घटनेमध्ये राजश्री मोहन घाडगे या तीन वर्षीय मुलीचा मृत्यू झाला. देगाव येथे राहणाऱ्या मोहन घाडगे यांची मुलगी राजश्री दुपारी घरासमोर खेळत होती. यावेळी घाडगे कुटुंबातील सदस्य शेतीच्या कामात व्यस्त होते. राजश्री ही खेळता खेळता घरासमोरील हौदात पडली. त्यावेळी तिच्याकडे कोणाचेच लक्ष न गेल्यामुळे पाण्यात बुडून तिचा अंत झाला. दरम्यान या घटनेमुळे घाडगे कुटुंबावर शोककळा पसरली असून देगावमध्ये देखील हळहळ व्यक्त होत आहे.









### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कोन कब खुर्सी पर बैठेगा, ये सिर्फ वक्त जानता हैं!


कल्याण
256-37-467

मेन बाजार
680-43-346


## पिडिता, पंच फितूर होऊनही आरोपीस ७ वर्षांची सक्तमजुरी


### डीएनए रिपोर्टनुसार अल्पवयीन मुलीला गर्भवती केल्याचे निष्पन्न

सोलापूर : एका १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला गर्भवती केल्याने, त्या बाळाशी डीएनए जुळल्याने आरोपीला सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश कविता शिरभाते यांनी सुनावली. फट्या ऊर्फ नागेश नारायण राऊत (वय २४, रा.मोहोळ) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. पीडितेने २०१७ मध्ये सिव्हिल हॉस्पिटल येथे मुलीला जन्म दिला. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला.

या प्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांच्या कोर्टात झाली. यात सरकार पक्षातर्फे आरोपीने पीडितेवर शारीरिक अत्याचार केल्याचे डी. एन. ए. अहवालाद्वारे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. याप्रकरणी सरकार पक्षाच्यावतीने सहा.सरकारी वकिल प्रकाश जन्नु, अॅड. शीतल डोके, अॅड. माधुरी देशपांडे, तर आरोपीच्यावतीने अॅड. भारत कट्टे यांनी काम पाहिले. प्रकरणाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक बी. बी. जाधव यांनी केला. कोर्ट पैरवी म्हणून भोसले व पवार यांनी काम पाहिले आहे. सरकारी पक्षातर्फे एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे पिडितेचा उलट तपास व तपासी अंमलदार यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. पिडिता, पिडितेची आई सरकार पक्षास मदत न करता फितूर झाल्या. डी. एन. ए. रिपोर्टनुसार आरोपी हाच पीडितेला झालेल्या मुलीचा वडील असल्याचा सरकारी वकिलांनी युक्तिवाद केला.

# विरोधकांपुढे आव्हान...

देशातील ईशान्येमधील काही राज्यात झालेल्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या 'कमळा'चाच जोर दिसून आला आहे. त्रिपुरात भाजपने अपेक्षेप्रमाणे सत्ता राखली. मात्र त्यांना शेवटपर्यंत झुंज द्यावी लागली. नागालँडमध्ये विरोधकच नव्हते. त्रिपुरात भाजपने अपेक्षेप्रमाणे सत्ता राखली. मात्र त्यांना शेवटपर्यंत झुंज द्यावी लागली. नागालँडमध्ये विरोधकच नव्हते. तेथे एनडीपीपी-भाजपने मोठे यश मिळवले. मेघालयमध्ये त्रिशंकू स्थिती असली तरी, कॉनराड संगमा यांचे एनपीपी पुन्हा सत्तेत येईल हे स्पष्ट आहे. मात्र ते भाजपला बरोबर घेणार की छोटे पक्ष किंवा यूडीपीशी सत्तेसाठी आघाडी करणार ते पाहणे औत्सुक्याचे आहे. दहा वर्षांपूर्वी ईशान्येकडे जेमतेम अस्तित्व असलेल्या भाजपने आता घट्ट पाय रोवल्याचे या निकालाने अधोरेखित झाले आहे. या निकालाद्वारे भाजपने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वीची ही पहिली फेरी जिंकल्याचे मानले जात आहे. २०२३ची सुरुवात भाजपने विजयाने केली आहे. आसामपाठोपाठ त्रिपुरात सत्ता राखण्यात भाजपला यश मिळाले असले तरी, गेल्या म्हणजेच २०१९च्या निकालाच्या तुलनेत मतांमध्ये दहा टक्के घट झाली आहे. त्यांच्या दहा जागा कमी झाल्या आहेत. त्याचे एक प्रमुख कारण राजघराण्यातील प्रद्योत देव बर्मन यांच्या टिपरा मोथा पक्षाने १२ जागा जिंकत भाजपच्या आदिवासी मतांमध्ये फूट पाडली. गेल्या वेळी आदिवासीबहुल भागात २० पैकी १८ जागा भाजपने जिंकल्या होत्या. भाजपचा मित्रपक्ष असलेल्या आयपीएफटीला केवळ एक जागा जिंकता आली. हेदेखील आदिवासी पट्ट्यातील भाजपच्या जागा घटण्याचे एक कारण ठरले. अर्थात खुल्या गटातील ४० पैकी अनेक प्रमाणात जागा भाजपच्या पारड्यात पडल्या. त्याचे एक कारण टिपरा मोथाने स्वतंत्र आदिवासी राज्यासाठी मागणी केल्यावर बंगाली हिंदू भाजपच्या मागे एकवटले. सर्वसाधारणपणे राज्यात ६० टक्के बंगाली हिंदू आहेत. विचारसरणी बाजूला ठेवत डावी आघाडी-काँग्रेस एकत्र आल्यावरही फारसा प्रभाव पडला नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला जेमतेम दोन आकडी जागा जिंकता आल्या. अडीच दशके येथे डाव्यांची राजवट होती. त्यांना भाजपविरोधात वातावरण तयार करता आले नाही. माजी मुख्यमंत्री व माकपचे ज्येष्ठ नेते माणिक सरकार यंदा रिंगणात नव्हते. राज्यात आता डाव्यांपुढे आव्हान असेल. केंद्रात भाजपचे सरकार त्याचप्रमाणे गेल्या साडेआठ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५१ दौरे ईशान्येकडील राज्यांत केले आहेत. त्यामुळे ईशान्येकडील राज्यांसाठी भाजप वचनबद्ध असल्याचा एक संदेश आपोआप गेला. पायाभूत सुविधांच्या मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या कामांनी भाजपला यश मिळाले. दीड वर्षांपूर्वी बिप्लब देव यांना बदलून मितभाषी माणिक सहा यांना मुख्यमंत्री आणण्याचा निर्णय पथ्यावर पडला.नागालँडमध्ये नॅशनलिस्ट डेमॉक्रेटिक पक्ष व भाजप यांच्या आघाडीला फारसा विरोध नव्हता. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या नॅशनल पीपल्स पक्षाला ६० जागी उमेदवारही मिळाले नाहीत. मुख्यमंत्री नैफीयो रिओ यांनी राज्यात शांतता प्रस्थापित केल्याने ते लोकप्रिय आहेत. आता चौथ्यांदा मुख्यमंत्री होतील. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदा महिला विजयी झाल्या आहेत हे निकालाचे एक वैशिष्ट्य. एनडीपीपीच्या हेकिना झलकू या पहिल्या महिला आमदार ठरल्या आहेत. याखेरीज रिपब्लिकन पक्षाच्या आठवले गटाने दोन जागा जिंकल्या आहेत. मेघालयमध्ये राज्य निर्मिती झाल्यापासून १९७२चा अपवाद वगळता एकदाही एखाद्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. गेल्या ४५ वर्षांत राज्याने २५ मुख्यमंत्री पाहिले आहेत. त्या तुलनेत गेल्या पाच वर्षांत मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांच्या एनपीपीने स्थिर सरकार दिले. आताही त्यांच्या पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी बहुमतापासून ते वंचित राहिले. ते सत्तेसाठी भाजपबरोबर जाणार की इतर छोट्या पक्षांना बरोबर घेणार हे पहावे लागेल. मात्र केंद्रातून मदतीची गरज ईशान्येकडील राज्यांना असते, त्यामुळे भाजपला सत्तेत घेतील,असे वाटते.भारत जोडो यात्रेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या कामगिरीबाबत उत्सुकता होती. नागालँडमध्ये त्यांना खातेही उघडता आले नाही. तर गेल्या वेळी मेघालयमध्ये सर्वाधिक जागा जिंकलेल्या काँग्रेसला यंदा जेमतेम पाच जागा मिळाल्या. त्याचे एक कारण मुकुल संगमा पक्षातील दहा ते बारा आमदारांसह तृणमूल काँग्रेसमध्ये सामील झाले होते. मात्र तृणमूल काँग्रेसलाही जनतेने साथ दिलेली नाही. आसामचे मुख्यमंत्री व भाजपचे ईशान्येकडील राज्यांमधील समन्वयक हेमंत बिस्व सरमा यांच्या नियोजनामुळे पक्षाला यश मिळाले आहे. आता ईशान्येकडील आसाम व त्रिपुरात भाजपची स्वबळावर सत्ता आहे. उर्वरित ठिकाणी आघाडीच्या माध्यमातून भाजपचा सत्तेशी संबंध आहे. हे पक्षाच्या दीर्घकालीन नियोजनाचे यश आहे. या तीन राज्यांमध्ये लोकसभेच्या पाचच जागा असल्या तरी, भाजपच्या चांगल्या कामगिरीने या निकालाचा संदेश देशभर जाणार आहे.२४ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधकांना एकत्र यावे लागेल हाच संदेश निकालांनी दिला आहे.



## सामाजिक

# व्यवसायातील संशोधन आणि नाविन्य

**आजकाल, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर प्रकाशित होत असलेल्या अभ्यास अहवालांमध्ये, भारतातील आर्थिक आणि औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी, सरकारने तसेच देशातील उद्योगांनी संशोधन आणि विकास (R&D) वर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे असे समोर येत आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की ताज्या अहवालांनुसार, सध्या जगाच्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) सुमारे दोन टक्के संशोधन आणि विकासासाठी खर्च केला जातो. युरोपियन युनियनमध्ये जीडीपीच्या सुमारे दोन टक्के R&D वर खर्च होत आहे आणि अमेरिका, जपान आणि इतर अनेक विकसित देशांमध्ये तीन टक्क्यांहून अधिक खर्च केला जात आहे. तर सध्या भारतात यावर जीडीपीच्या ०.६७ टक्के खर्च होत आहे. सध्या, अमेरिका, चीन, जपान, जर्मनी आणि दक्षिण आफ्रिका यांचा हिस्सा जगातील संशोधन आणि विकासावर खर्च होणाऱ्या वार्षिक रकमेच्या तीन चतुर्थांशपेक्षा जास्त आहे. हे सर्व देश संशोधन आणि विकासाच्या बळावर उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रात जगात आघाडीवर आहेत.**

इंदूर येथे नुकत्याच झालेल्या 'इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन'च्या २९व्या जागतिक परिषदेत, आरोग्य संशोधनाच्या क्षेत्रात अभूतपूर्व जागतिक योगदान देणाऱ्या फ्रान्सच्या जीन-लुईस टेबोल यांनी सांगितले की, भारताकडे ज्ञानाचा खजिना आहे, परंतु त्याची संशोधनात कमतरता आहे. भारतातील सरकारसह उद्योगांनी संशोधन आणि नवकल्पना (रिसर्च-इनोवेशन) वर अधिक लक्ष दिल्यास, भारत जगात आरोग्यासह विविध आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात वेगाने उंची गाठू शकेल.

भारताने गेल्या दशकात संशोधन आणि नावीन्यपूर्ण क्षेत्रात प्रगती केली असली तरी जगातील इतर प्रमुख अर्थव्यवस्थांच्या तुलनेत तो अजूनही मागे आहे. अलिकडेच, संयुक्त राष्ट्रांच्या एजन्सी 'वर्ल्ड इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑर्गनायझेशन' (WIPO) द्वारे जारी केलेल्या 'ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स' मध्ये, भारत २०२२ मध्ये चाळीसव्या स्थानावर पोहोचला आहे, तर २०२१ मध्ये तो ४६व्या स्थानावर होता.

२०१५ मध्ये भारत ८१व्या क्रमांकावर होता. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारताने निम्न, मध्यम उत्पन्न गटाच्या जागतिक नवोपक्रम निर्देशांकात प्रथम स्थान गाठले आहे. या गटात जगातील ३६ देशांचा समावेश करण्यात आला आहे. ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये स्वित्झर्लंड पहिल्या, अमेरिका दुसऱ्या आणि स्वीडन तिसऱ्या क्रमांकावर आहे. थायलंड, व्हिएतनाम, रशिया आणि ब्राझील यांसारख्या देशांच्या तुलनेत भारत नाविन्याच्या बाबतीत पुढे गेला आहे. उल्लेखनीय आहे की अलिकडेच 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन' समारंभाला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, 'सध्या संशोधन आणि नवोन्मेष निर्देशांकात भारताची क्रमवारी वाढत आहे. संशोधन आणि कल्पकतेमुळे पायाभूत सुविधा, आरोग्य, डिजिटल, कृषी, शिक्षण, संरक्षण यासह विविध क्षेत्रात प्रगती होत आहे. भारतातील नवकल्पना जगातील सर्वात स्पर्धात्मक, किफायतशीर, शाश्वत, सुरक्षित आणि व्यापकपणे लागू होणारे उपाय ऑफर करत आहेत.' आज भारतात ७० हजारांहून अधिक स्टार्टअप्स आहेत, त्यापैकी शंभरहून अधिक युनिकॉर्न आहेत. अशा परिस्थितीत संशोधन आणि नवनिर्मितीला अधिक प्रोत्साहन देऊन देशाला उत्पादन केंद्र बनविण्यासह विविध क्षेत्रात विकासाला नवी गती देण्याच्या मार्गावर भारत पुढे जात आहे.





कोविड-१९ ही भारतातील नवीन वैद्यकीय संशोधन आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्याची संधी होती. जेव्हा फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये देशात कोरोना संसर्गाची पहिली लाट सुरू झाली तेव्हा त्याच्या प्रतिबंधासाठी कोरोना लसीशी संबंधित संशोधन आणि उत्पादनाच्या कल्पना पुढे येऊ लागल्या होत्या. साधारणपणे कोणत्याही आजाराची लस तयार करण्यासाठी अनेक वर्षे लागतात, परंतु भारतातील कोरोना विषाणूचे आव्हान पाहता, त्याची लस बनवण्याचे अवघड लक्ष्य काही महिन्यांतच पूर्ण करण्यात आले.

कृषी क्षेत्राच्या प्रगतीमध्ये कृषी संशोधन आणि नवकल्पना यांचाही प्रभावी वाटा आहे. केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या मते, देशातील कृषी संशोधनाशी संबंधित १०० हून अधिक संशोधन संस्था, ७५ कृषी विद्यापीठे आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीआर) २० हजाराहून अधिक शास्त्रज्ञांचे समर्पित संशोधन कार्य आणि नवोपक्रमाला चालना देण्याबरोबरच कृषी क्षेत्राला विकासाकडे नेले जात असून त्यामुळे नवा अध्यायाला सुरुवात झाली आहे. असे असूनही या क्षेत्रात भारतातील उद्योग आणि व्यवसाय खूप मागे आहेत. हे उल्लेखनीय आहे की युरोपियन आयोग दरवर्षी संशोधन आणि नवकल्पना लक्षात घेऊन जगातील आघाडीच्या अडीच हजार कंपन्यांची माहिती प्रकाशित करते. २०२१च्या आकडेवारीनुसार या कंपन्यांमध्ये भारतातील केवळ २४ कंपन्यांचा समावेश आहे. तर अमेरिकेच्या ८२२, चीनमधल्या ६७८, जपानमधल्या २३३ आणि जर्मनीतल्या ११४ कंपन्यांचा समावेश आहे.

परिस्थिती अशी आहे की, जगातील पहिल्या पन्नास मोठ्या कंपन्यांच्या यादीत समाविष्ट असलेल्या भारतातील आंतरिक शोध आणि विकास (इन-हाऊस रिसर्च अँड डेव्हलपमेंट) मध्ये एकही मोठी संशोधन गुंतवणूक करणारी कंपनी नाही. देशातील सर्वोच्च कंपनी असलेल्या टाटा मोटर्स संशोधन आणि नवोपक्रमाच्या बाबतीत जगात ५८व्या क्रमांकावर आहे. एवढेच नाही तर संपूर्ण भारत जितकी गुंतवणूक करते त्यापेक्षा जगातील पहिल्या सात कंपन्या संशोधन आणि नवोपक्रमात जास्त गुंतवणूक करतात.

देशातील सर्वात फायदेशीर सॉफ्टवेअर, वित्तीय सेवा, पेट्रोकेमिकल्स आणि मेटल प्रोसेसिंग क्षेत्रातील कंपन्या संशोधन आणि नाविन्यपूर्ण खर्च करण्यात खूप मागे आहेत. परिस्थिती अशी आहे की देशातील टॉप १० सर्वाधिक कमाई करणाऱ्या सॉफ्टवेअर कंपन्या त्यांच्या विक्रीतील केवळ १ टक्का संशोधन आणि नवोन्मेषावर खर्च करतात, तर सरासरी जागतिक कंपन्या १० टक्के संशोधन आणि नवनिर्मितीवर खर्च करतात. या बाबतीत मागे राहिल्यामुळे भारताला अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात पुढे जाता आलेले नाही. हेच कारण आहे की तंत्रज्ञान हार्डवेअर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैमानिक, उत्पादन साहित्य, रसायन, औद्योगिक अभियांत्रिकी, फार्मास्युटिकल आणि ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील जागतिक बाजारपेठेत भारतीय कंपन्यांना फारच मर्यादित प्रवेश आहे. संशोधन आणि नवनिर्मितीचे बहुआयामी फायदे आहेत. याच्या आधारे विविध देशांतील उद्योजक आणि व्यावसायिक एखाद्या देशात आपले उद्योग आणि व्यवसाय सुरू करण्याचे निर्णय घेतात. जगभरातील सरकारेही त्यांच्या जागतिक उद्योग-व्यावसायिक संबंधांसाठी ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स लक्षात घेऊन धोरणे राबवतात. भारतात संशोधन आणि नवकल्पना जसजशा वाढत आहेत, तसतसे त्याचे फायदे दिसू लागले आहेत. त्यामुळे अमेरिका, युरोप आणि आशियाई देशांतील मोठमोठ्या कंपन्या त्यांचे 'ग्लोबल इन हाउस सेंटर' (GIC) वाढवत आहेत.

प्रख्यात जागतिक वित्तीय आणि व्यावसायिक कंपन्या भारतात झपाट्याने त्यांची पावले टाकताना दिसत आहेत. यामुळे देशातील स्पर्धा आणि रोजगाराच्या संधी वाढत आहेत. सुमारे सहा-सात दशकांत, माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, औषध, अवकाश संशोधन, ऊर्जा आणि इतर अनेक क्षेत्रात वेगाने वाटचाल करून संशोधन आणि नवकल्पना यावर अधिक खर्च करून अमेरिका जगातील सर्वात शक्तिशाली देश बनला आहे.

आर्थिक महासत्ता आणि विकसित देश होण्यासाठी भारतालाही संशोधन आणि विकासाच्या अशा सुविचारित धोरणावर काम करावे लागेल, जेणेकरून सरकार, खाजगी क्षेत्र आणि संशोधन संस्था यांच्यातील सहजीवन आणि समन्वयाचे धागे पुढे नेले जातील. विशेषत: देशातील मोठ्या कंपन्यांमध्ये संशोधन आणि विकासासाठी गुंतवणूक वाढवावी लागेल.

देशाचा झपाट्याने होत असलेला विकास आणि सरकारकडून सर्वसामान्यांचे आर्थिक-सामाजिक कल्याण पाहता देशातील उद्योग-व्यवसाय विश्वाच्या माध्यमातून जगातील विविध विकसित देशांप्रमाणे भारतही संशोधन आणि नवोपक्रमावर जीडीपीच्या दोन टक्क्यांहून अधिक खर्च करेल, अशी अपेक्षा आहे.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत.**

## वाढदिवसानिमित्त

# युवकांचे प्रेरणास्थान : डॉ. धवलसिंह

**युवकांच्या हृदयावर विराजमान होऊन आपल्या कर्तृत्वाचा व खंबीर नेतृत्वाचा ठसा उमटवणारे आमचे आदरणीय मार्गदर्शक व युवकांचे झुंझार नेते दादासाहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्यावर चार शब्द लिहिण्याचे भाग्य मला लाभले. हा माझा मी बहुमान समजतो.**

**शुद्ध बिजा पोटी । फळे रसाळ गोमटी ।।**

काकासाहेबांचा वारसा आदरणीय पप्पासाहेबांनी घेतला. पप्पासाहेबांच्या कार्याची धुरा आदरणीय दादासाहेबांनी घेतली असं म्हटलं जातं. कोणत्याही गोष्टींचे यथार्थ आकलन होणे आणि ती योग्यप्रकारे करावयाची क्षमता असणे म्हणजेच व्यवहारज्ञान. या व्यवहारज्ञानाच्या विपुलतेचे बाळकडू उपजतच दादांना मिळालेले आहे. युवकांसमोर सकारात्मक व्यक्तिमत्त्वाचा आदर्श निर्माण करून युवक वर्गामध्ये आत्मविश्वास व कार्यकर्त्यांमध्ये स्फूर्ती निर्माण करण्याचे कौशल्य, दूरदृष्टी, अध्ययावत ज्ञान, कामातील सातत्यक्षमता, नेतृत्वक्षमता, निर्णय क्षमता, समन्वयक्षमता, दृढआत्मविश्वास चिकाटी, नम्रता या बहुगुणांच्या माध्यमातून समाजउपयुक्त विविध कार्य जनसेवा संघटनेच्या माध्यमाने करतात. श्री शंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून ते काम करत असतानाच राष्ट्रीय समाजश्री पुरस्कार हा समाजाशी निगडीत असल्याने समाजाच्या अडचणी, सुख-दुःख, समाजाशी जवळीक जे नेतृत्व साधते, त्या व्यक्तींनाच समाजभूषणाचे कोंदण प्राप्त होते. अष्टपैलू हिरा जसा अंगठीच्या कोंदणात शोभतो तसा अष्टपैलू नेतृत्वाचा हिरा समाजभूषण पुरस्काराच्या कोंदणात शोभून दिसतो ते अष्टपैलू नेतृत्व म्हणजेच आदरणीय धवलदादा यांना समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.



भारतामध्ये जवळ जवळ ७० टक्के लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती हेच असल्याने शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. याच शेती क्षेत्राच्या विकासासाठी स्वतः दादांनी कृषीक्षेत्राचे शिक्षण घेऊन गरिबातील गरीब शेतकऱ्याला शेतीसंबंधी अद्ययावत माहिती कशी उपलब्ध करून देता येईल. याकरिता दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्याचे नंदनवन करण्याकरिता कृषी मेळाव्याचे आयोजन करून शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील अज्ञानीपणा कमी करण्यासाठी आधुनिक शेती संशोधन पद्धतीचा स्वीकार करणे व शेती उत्पादकतेमध्ये वाढ घडवून आणणे. त्यासाठी नवीन कृषी तंत्रज्ञान खते, बी-बियाणे, पाणी आडवा-पाणी जिरवा, कृषी कर्ज सुविधांची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देऊन कृषी क्षेत्राचा विकास साधण्याच्या दृष्टिकोनातून उल्लेखनीय कर्तृत्व नेतृत्व व दातृत्व या त्रिकोणाचा केंद्रबिंदू म्हणजेच आदरणीय दादासाहेब.

**केल्याने होत आहे हे । आधी केलेची पाहिजे ।**

मात्र तेथे सद्गुरूंचे अधिष्ठान पाहिजे. या समर्थांच्या उक्तिप्रमाणे समाजकारण, राजकारण या गोष्टी पहात आहेत. अध्यात्माच्या कुरुक्षेत्रावर आदरणीय दादांनी आघाडी मारलेली आहे .

**संग जया जैसा । लाभ तया तैसा ।।**

जशी संगती तसे फळ म्हणून सत्संग. चांगल्या गोष्टींची साथ ही एकट्यापुरतीच मर्यादित न ठेवता एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ। या जाणिवेने समाजाच्या तळागाळातील लोकांना अध्यात्माचा सुगंध देण्याचे धार्मिक कार्य सत्संगाच्या माध्यमातून करत आहेत, याची प्रचिती आपल्याला येत आहे.

**- प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर.**

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते - पाटील महाविद्यालय, नातेपुते.

## जन्म हा अखेरचा

## ज्ञानाचार स्थल



हे ज्ञान जेंव्हा तुम्हांला होईल तेंव्हा सर्व प्रपंच निर्विकल्प, निष्कल अशा शिवरुपात दिसू लागेल. परंतु त्यासाठी शिवभावना दृढ करण्याचा अभ्यास करायला हवा. श्रवण, मनन, निदिध्यास करुन जो साधना करतो, त्याची दृष्टी हळूहळू अंतर्मुख होऊ लागते. मग त्याला सर्व प्रपंच शिवमय दिसू लागतो. तुमची दृष्टी जर बहिर्मुख असेल तर तुम्हांला तुमच्या हृदयातला शिवदेखील दिसणार नाही.

**ज्ञानं मुक्तिप्रदं प्राप्य गुरुदृष्टिप्रसादत: ।**
**क: कुर्यात् कर्मकार्पण्ये वांछां संसारवर्धने ।।१६.८१।।**

ज्ञानप्राप्तीसाठी जशी परिश्रमाची गरज असते तशीच गुरुच्या कृपादृष्टीची आवश्यकता असते. गुरुकृपा नसताना कितीही अभ्यास केला तरी नीट आकलन होत नाही. गुरुवर नितांत श्रद्धा ठेवून, त्यांच्याकडून श्रवण करुन, जो साधना करतो त्यालाच मुक्तिप्रद ज्ञान लाभते. अशा ज्ञानी पुरुषाकडून ज्यांच्यामुळे पुनर्जन्म मिळतो, अशी कर्मे घडत नाहीत. त्याची कर्मे ज्ञानमय असतात. ज्ञानरुपी सामग्रीने ज्ञानरुप अशा परमात्म्याची तो सदैव पूजा करीत असतो.

**कर्म ज्ञानाग्निना दग्धं न प्ररोहेत् कथंचन ।**
**यदाहु: संसृतेर्मूलं प्रवाहानुगतं बुधा: ।।१६.८२।।**

ज्याला गुरुकृपेने आणि परिश्रमाने ज्ञान लाभते, त्याची सारी कर्मे दग्ध होतात. ज्ञानाग्नीत मोठे सामर्थ्य असते. माणूस जन्माला येतानाच आपल्या मनात जन्मजन्मांतरातील संचितकर्म घेऊन येतो. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### इंटरनेट बंद करून नेमके काय साधायचे असते?

तंत्रज्ञानापासून प्राप्त झालेले लाभ सामान्यांपर्यंत पोहचविताना मोठा गाजावाजा करून त्यांना खूश करण्याचा प्रयत्न केले जातात. कालांतराने त्यांचा उपयोग जनता, लोकांचा समुदाय, संघटना इत्यादिंकडून प्रशासकांविरोधात चळवळी, आंदोलने, निदर्शने,हिंसाचार, निवडणुका, मोर्चे करण्यात किंवा तत्संबंधी माहितीचा प्रसार करण्यासाठी केला जातो तेव्हा जगभरातील प्रशासक सरकारे आपल्या अधिकारांचा वापर करून इंटरनेट सारखी सेवा खंडित करतात. जेणेकरून सामान्यांना कोठे काय चालले आहे याचा थांगपत्ता लागू शकत नाही. 'ॲक्सेस नाऊ आणि किप ईट ऑन' या इंटरनेट ॲडवोकेसी क्षेत्रात काम करणाऱ्या एजन्सीजनी आपल्या संयुक्त अहवालात जगभरात सन २०१६ पासून इंटरनेट बंद होण्याच्या प्रकरणात सुमारे ५८ टक्के प्रकरणे भारतात नोंदविली गेलीत, असे निरीक्षण नोंदविले आहे.

सन २०२२ मध्ये जगातील एकूण नोंदविल्या गेलेल्या प्रकरणांमधील १८७ प्रकरणांपैकी ८४ प्रकरणे भारतात नोंदविली गेली. जम्मू काश्मीर, राजस्थान, प. बंगाल या राज्यांत अधिकतर वेळा इंटरनेट बंद केले गेले. या बंदिपायी करोडो रुपयांचे नुकसान होते. केंद्रीय आणि राज्य स्तरांवरील गृहमंत्रालये आपत्कालीन परिस्थिती किंवा सार्वजनिक सुरक्षिततेच्या कारणांस्तव इंटरनेटचे तात्पुरते खंडन/निलंबन करतात. मात्र, निदर्शने, हिंसाचार, दंगली, मोर्चे अशा प्रकारच्या निषेधात्मक घटना घडू लागताच इंटरनेट बंदी हे त्यांचा प्रसार थोपविण्यासाठी वापरले जाणारे अस्त्र म्हणजेच नेटबंदी ज्या कारणांसाठी करावी लागते, त्या कारणांचा उगम शोधून त्यावर मार्ग काढण्याची प्रामुख्याने गरज आहे.

सनदशीर मार्गाने मांडलेल्या मागण्या, सूचना, सुचविलेल्या दुरुस्त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी जेव्हा दीर्घकाळ दिरंगाई होते, तेव्हाच जनसमुदाय असनदशीर मार्गांचा अवलंब करीत असतात असे आढळून आले आहे. वर्तमानात तरुण पिढीला शाळा कॉलेजेसमधील प्रवेश मिळविणे, गरजवंतांना नोकऱ्या मिळविण्यात सतत अपयश येणे किंवा शेतकरी वर्ग, कामगार संघटना त्यांच्या थकित मागण्यांकडे दुर्लक्ष करणारे मालकवर्ग किंवा प्रशासन दीर्घकाल मागण्या मंजूर करीत नाहीत तेव्हाच न्याय मागण्यासाठी रस्त्यांवर उतरून निषेध व्यक्त करतात. कदाचित सामंजस्य आणि परिसंवाद साधल्यास अधिकारांत प्राप्त झालेली बंधने लादण्याची गरजही प्रशासकांना भासणार नाही.

**- स्नेहा राज, गोरेगांव.**

## लाईनमन दिवस

# लाईनमन : उजेड देणारा माणूस

लाईट गेल्याशिवाय लाईटची किंमत कळत नाही असे म्हणतात. पण लाईट येऊनही ती कुणामुळे आली हे कुणी जाणून न घेतल्याने 'तो' कायम दुर्लक्षितच राहतो. कारण विजेचा धंदा हा तसा जोखमीचा. त्यामुळे कामातली चूक एखाद्याला जिवानिशी चुकवावी लागते. इथे जर-तर, चर्चा, हुशारी काही कामाची नसते. प्रत्येक कामात तितकीच जोखीम असते. इतके असूनही 'लाईनमन'च्या आयुष्यावर आजवर कोणी 'प्रकाश' टाकलेला नाही. मात्र, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने यावर्षीपासून ४ मार्च हा दिवस संपूर्ण देशभर 'लाईनमन दिवस' म्हणून साजरा करण्याचे निर्देशित केले आहे. या दिवसामुळे का होईना लाईनमन समाजाला समजेल आणि समाजही त्याला समजून घेईन.

**या मुलुखाची चिठ्ठी पर मुलुखातल्या आपल्या प्रियजनांपर्यंत पोहोचवणाऱ्या पोस्टमनची समाजाने पूर्वीपासून दखल घेतली. पोस्टमनच्या दैनंदिन आयुष्यावर प्रकाश टाकणारे अनेक सिनेमे, माहितीपट, मालिका निघाल्या. ज्यातून पोस्टमन घराघरांत पोहोचला. पण त्याच्याप्रमाणेच प्रकाशरुपी आनंद नित्यनेमाने देणारा 'लाईनमन' मात्र आजवर दुर्लक्षित राहिला होता.**

मुंबईतला काही भाग वगळला तर सबंध महाराष्ट्राला वीजरूपी ऊर्जा पुरविण्याचे काम महावितरण ही सरकारी कंपनी करत आहे. नैसर्गिक आपत्ती, सामाजिक विरोध पत्करून या कंपनीला कायम कार्यरत रहावे लागते. ग्राहक म्हणून आपल्याला कंपनीकडून अखंडितपणे वीज हवी असते. अगदी २४ तासांत एका मिनिटाचा जर खंड पडला तरी वीज यंत्रणेला टीकेचा धनी व्हावे लागते. पण, ती यंत्रणा तुम्ही-आम्ही समजून घेत नाहीत. गेलेली वीज कोणीतरी रात्री-अपरात्री पोलवर झालेला बिघाड दुरुस्त केल्याशिवाय येत नाही. हा वायरचा उद्योग आहे. वायरलेसप्रमाणे याकडे पाहणे चुकीचे ठरेल.

महावितरणचा विचार केला तर एकूण कर्मचाऱ्यांच्या तुलनेत जवळपास ८० टक्के कर्मचारी हे विजेच्या कामात थेट सामावलेले आहेत. ग्राहकाच्या मीटरपर्यंत वीज पोहोचविण्याचे काम प्रमुखत: लाईनमनरुपी कर्मचारी करत असतो. पदोन्नती आदी कारणांमुळे वीज कर्मचारी कंपनीत वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असले तरी समाजासाठी तो फक्त लाईनमनच असतो.

६० च्या दशकात वीज प्रत्येकापर्यंत पोहाचलेली नव्हती. याउलट आज वीज नसलेलं घर शोधावं लागेल. महावितरणची ग्राहकसंख्या २ कोटी ९२ लाख असून, विजेचा वापर १ लाख २२ हजार दशलक्ष युनिटच्यावर पोहोचला आहे. रक्तवाहिन्यांप्रमाणे पसरलेलं हे विजेचे जाळे ११ लाख किलोमीटरचं झालंय.

४०९४ उपकेंद्रातून राज्याला २५ हजार मेगावॅट वीज पोहोचवण्याचं अखंड काम महावितरणचे हे लाईनमन अविरत करत आहेत. या अवाढव्य पसरलेल्या यंत्रणेची नियमित देखभाल, दुरुस्ती करण्याचे काम महावितरणचे ८१ हजार ७०९ कर्मचारी करतात. या जोखमीच्या कामात अनेकांना आपल्या प्राणाला मुकावं लागलं आहे तर शेकडो लाईनमन आजवर जायबंदी झालेत. आता या क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून 'लाईनवुमन'ची भरती झाली आहे. महिला असूनही त्या पुरुष कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने काम करत आहेत. या लाईनमन दिनाच्या निमित्ताने किमान यापुढे तरी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता तुमच्या-आमच्यासाठी काम करणाऱ्या लाईनमनला, त्याच्या कामाला प्रतिष्ठा मिळेल, ही आशा आहे. त्यांच्या या कामात त्यांनी सुरक्षेचा अवलंब करावा, स्वत: च्या आयुष्याची काळजी घेऊन ह्या महाराष्ट्राला आणखी ऊर्जावान राज्य बनवावे, ह्याच शुभेच्छा !



**- विकास पुरी,**

जनसंपर्क अधिकारी, महावितरण,
बारामती परिमंडल

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णुपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## अध्यात्मिक विकासासाठी प्रजापिता संस्थांची गरज : काळे

**सोलापूर** : सोलापुरातील जुळे सोलापूरच्या भागाचा विकास साधायचा असेल तर प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयासारख्या आध्यात्मिक संस्थेची गरज असल्याचे प्रतिपादन सोलापूर महापालिकेचे माजी उपमहापौर राजेश काळे यांनी केले. जुळे सोलापूर मधिल जुने संतोष नगर येथील ब्रह्माकुमारी पाठशाळेत महाशिवरात्री महोत्सवानिमित्त गुरुवार दि. २ रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते . यावेळी जेष्ठ कवी गोविंद काळे हे ही उपस्थित होते. प्रारंभी संस्थेच्या संचालिका बी के. राजयोगिनी सोमप्रभा दिदी , बी के. सदिक्षा, बी के. सुजाता, बी के. कीर्ती, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेच्या संचालिका राजयोगिनी सोमप्रभा दिदी यांनी शब्द सुमनांद्वारे सर्वाचे स्वागत केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बीके. रेवणिसिध्द, बीके. शिवशंकर, बीके. फरिस्ता, बीके. गणेश, बीके. अमर, बीके. आदित्य, बीके. कन्नुरे आदिनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीके. सदिक्षा यांनी केले तर आभार बीके. रेवणसिध्द यांनी मानले.

## पैशाच्या कारणावरून बेल्टने मारहाण

**सोलापूर** : पैशाच्या कारणावरून शिवीगाळ करत बेल्टने मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.१ मार्च रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास न्यू बुधवार पेठ येथे घडली.याप्रकरणी सुभाष सुखदेव कांबळे (वय-३६,रा.न्यू बुधवार पेठ,सम्राट चौक,सारडा हॉस्पिटल समोर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून श्रीकांत सुखदेव कांबळे, प्रतीक श्रीकांत कांबळे,गोटू श्रीकांत कांबळे (सर्व.रा.न्यू बुधवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.हे. कॉ. जमादार हे करीत आहेत.

# जिल्ह्यातील एक हजार २७६ मागासवर्गीय, ५१८ अपंग लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप

- दोन कोटी ५६ लाख ९९ हजार रुपयांचे होते साहित्य
- व्ही.डी.ओ. चित्रिकरणाचा पुरावा ठेवत चिठ्ठयांद्वारे लाभार्थ्यांची सोडत

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीचे एक हजार २७६ व ५१८ दिव्यांग लाभार्थ्यांना दोन कोटी ५६ लाख ९९ हजार रुपयांचे साहित्य खरेदीसाठी अनुदान वाटपाची सोडत गुरुवारी काढण्यात आली. लकी ड्रॉ (चिठ्ठ्या टाकून) पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे ही सोडत पारदर्शक असावी, यासाठी सोडतीच्या सर्व प्रक्रियेचे व्ही.डी.ओ. चित्रीकरण करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या उत्पन्नातून समाज कल्याण विभागामार्फत (सेस फंडातून) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (२० टक्के) व दिव्यांग लाभार्थ्यांना (५ टक्के) व्यवसायाभिमुख साहित्यासाठी अनुदान देण्यात येते.

चालू आर्थिक वर्षासाठी (२०२२-२३) दोन कोटी ५६ लाख ९९ हजार इतकी तरतूद सेस फंडातून या योजनेसाठी करण्यात आली आहे. त्या - त्या तालुक्याच्या पंचायत समित्यांमार्फत पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव मागवून त्या प्रस्तावांची छाननी करून गुरुवारी (दि.२) जिल्हा परिषदेतील यशवंतराव चव्हाण सभागृहात चिठ्ठयांद्वारे लाभार्थी निश्चित करण्यात आले. जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून दक्षिण सोलापूरचे गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. समाज कल्याण विभागाचे कक्षअधिकारी शीतलकुमार कंदलगावकर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता सच्चिदानंद बांगर, विस्तार अधिकारी स्वाती गायकवाड, शशिकांत ढवळे यांनी ही प्रक्रिया काटेकोरपणे पार पाडली. सोलापुरातील नागनाथ मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहातील संस्कार नागेश पाटील व विश्वेश्वर कलप्पा हिरनळी या दोन पाचवीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना बोलावून त्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. साहित्याचे नाव व सोडतीत भाग्यवान ठरलेल्या अनुसूचित जाती, जमातीच्या लाभार्थ्यांची संख्या व कंसात एकूण अनुदानाची रक्कम पुढील प्रमाणे - शिलाई मशीन - ३५२ लाभार्थी (३० लाख रुपये), सायकल - ५०० (२५ लाख), पिठाची चक्की - ३५८ (६९ लाख ९९ हजार रुपये) व झेरॉक्स मशीन - ६६ (३० लाख रुपये) त्य व दिव्यांग लाभार्थ्यांची संख्या, साहित्य व एकूण अनुदान पुढील प्रमाणे - शेळी गट १३९ (६७ लाख रुपये), पिठाची गिरणी २५१ लाभार्थी (४९ लाख रुपये) झेरॉक्स मशीन १०८ लाभार्थी (४९ लाख रुपये).

### सोडतीत पारदर्शकता

सध्या जिल्हा परिषदेत प्रशासक राज असून वाटपाच्या सोडतीत कमालीची पारदर्शकता ठेवली होती. सोडतीच्या सर्व प्रक्रियेचे व्ही.डी.ओ. चित्रीकरण करण्यात आले होते. वशिलेबाजीला थारा न देता लकी ड्रॉ पद्धतीने लाभार्थी निश्चित करण्यात आले.

### रोजगार निर्मितीला चालना : खमितकर

जिल्हा परिषद सेस फंडातून समाज कल्याण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील मागासवर्गीय, दिव्यांग बेरोजगार लाभार्थ्यांना पिठाची गिरणी, झेरॉक्स मशीन, शेळी गट घेण्यासाठी अनुदान देण्यात येते. ज्या उद्देसासाठी अनुदान मिळाले, त्यासाठीच त्याचा वापर केला तर रोजगार निर्मितीला चांगली चालना मिळते. काही प्रमाणात बेरोजगारीचे निर्मूलन व्हावे, हाच उदात्त हेतू जिल्हा परिषदेचा असल्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी सांगितले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक आरोपींना घेऊन गोव्यात

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाने काही दिवसापूर्वी एका फार्म हाऊस वरून गोवा राज्य निर्मित ३० लाखांची विविध कंपन्यांची दारू पकडली होती. या प्रकरणी योगेश पांढरे (रा.बुधवार पेठ) व उमाकांत कारंडे (रा. सोलापूर) या दोन आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यांना ३ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. दरम्यान, ती जागा शहरातील एका नेत्याच्या नावे असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाल्याने त्या नेत्याला चौकशीसाठी हजर राहण्यास नोटीस दिली आहे.

गोवामधून ही दारू आल्याने ती कोणाकडून घेतली याचा शोध घेण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे एक पथक आरोपींना घेऊन नुकतेच गोवा येथे गेले होते. पण तेथील आरोपींपर्यंत पोलिस पोहचू शकले नाही, यामुळे हे पथक पुन्हा परत आले. आरोपींना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले.




## फॅमिली प्लॅनिंगचे कै. आवाबाई वाडिया कर्तृत्वशालिनी स्मृती पुरस्कार जाहीर

सुराज्य/सोलापूर

फॅमिली प्लॅनिंगच्या राष्ट्रीय संस्थापिका पद्मविभूषण कै. आवाबाई वाडीया कर्तृत्वशालिनी स्मृती पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यावर्षी सोलापूर महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका फिरदोस पटेल, पत्रकार अश्विनी तडवळकर, सामाजिक कार्यकर्त्या व टायगर ग्रुप सोलापूरच्या अध्यक्षा कविता चव्हाण, यशस्वीनी ऍग्रो प्रोड्युसर कंपनीच्या संस्थापिका अनिता माळगे व साथी संस्थेच्या कार्यक्रम अधिकारी रंजना अक्षंतल- महिमकर यांना जागतिक महिला दिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय संस्थापिका पद्मविभूषण कै. आवाबाई वाडीया कर्तृत्वशालिनी स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार सोहळा मंगळवार दि. ७ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया. सोलापूर शाखेचे मुख्य कार्यालय, परमेश्वर कोळी समाज मंदीर, दयानंद कॉलेज रोड, भवानी पेठ येथे आयोजित केला आहे.

पोलिस उपायुक्त डॉ. दीपाली काळे यांच्या हस्ते हे पुरस्कार दिले जाणार असून स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, शाल व बुके असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान वालचंद समाजकार्य विभागाच्या प्रा. डॉ. विजया महाजन या भूषविणार आहेत अशी माहिती पुरस्कार निवड समितीचे समन्वयक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी दिली. या पुरस्कार वितरण समारंभास नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार, सचिव प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड व कार्यकारीणी सदस्यांनी केले आहे.

## चांदापुरी कारखान्याची ऊस बीले जमा : पाटील


**पिलीव** : ओंकार साखर कारखाना चांदापुरी ता माळशिरस या वर्षीच्या ऊस गळीत हंगामातील ऊसाचे बील १५ फेब्रुवारी पर्यत शेतकऱ्यांच्या नावावर बॅकेत २३०० रुपये प्रमाणे जमा केले आज पर्यत ७कोटी ८०लाख रूपये ऊस उत्पादक शेतकरयांना पहिले बील दिले आहे आशी माहिती कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी दिली.या वेळी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे चीफ इंजिनिअर तानाजी देवकाते चीफ केमेस्ट विठ्ठल आडत ज्ञानेश्वर जमदाडे ऊस विकास अधिकारी विष्णू गोरे चीफ अकाऊंट प्रविण पिसे मुख्य सूरक्षा आधिकारी बोडखे हे उपस्थित होते.











## चौंडेश्वरवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**अकलूज** : चौंडेश्वरवाडी (ता.माळशिरस) ग्रामपंचायतीच्या वतीने सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त चौंडेश्वरवाडी येथे मोफत सर्व रोग आरोग्य निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात जवळपास दोनशे रुग्णांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अवांतर खर्चास फाटा देऊन सर्वसामान्यांसाठी चौंडेश्वरवाडी ग्रामपंचायतने मोफत आरोग्य तपासणी राबविल्याबद्दल त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या आरोग्य शिबिरात रक्त तपासणी, लघवी तपासणी, साखर तपासणी याबरोबरच सर्व आजारांच्या तपासण्या करण्यात आल्या व यावर तज्ञ डॉक्टरांच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले या शिबिराचे उद्घाटन चौंडेश्वरवाडी ग्रामपंचायत सरपंच अलका इंगवले देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी स म शंकरराव मोहिते पाटील, रत्नप्रभादेवी मोहिते पाटील व लोकनेते प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले व शिबिराची सुरुवात करण्यात आली शंकरनगर प्राथमिक आरोग्य केंद्र व चौंडेश्वरवाडी उपकेंद्रातील डॉ. प्राजक्ता साळवे, डॉ. रेखा खटके, डॉ संभाजी गंगाधरे, लॅब टेक्निशियन सुवर्णा कारंडे, विलास झुरळे, संजय कांबळे, महादेव दडस, आरोग्य सहायिका सुप्रिया मोटे, श्रीमती ओव्हाळ, श्रीमती वसावे यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी सरपंच अलका इंगवले देशमुख, सदस्य नितीन साखळकर, सचिन सोनवणे, हुसेन शेख, बाळू सय्यद, वल्लभ गुजर, ग्रामविकास अधिकारी सावंत, मार्गदर्शक शिवाजीराव इंगवले देशमुख, धनाजी साखळकर, यशवंतराव लावंड, बाबासाहेब ननवरे, समाधान इंगवले देशमुख, दिलीप माने, श्रीमंत लांडगे, रणजीत कुडाळे, राजू शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन

**सोलापूर** : श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळाच्या महिला विभाग स्थापनेचे २८ वर्ष साजरा करीत असून, महिला दिनाचे औचित्य साधून रविवार दि. ५ मार्च रोजी सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. या स्पर्धा महिला मंडळांसाठी असून सोलापुरातील सुमारे ८ ते १० मंडळांनी सहभाग घेतला आहे. यामध्ये रांगोळी स्पर्धा, तांदळापासून मिठाई, पुलाव बनविणे, एकल नृत्य, एकल अथवा दुहेरी सादरीकरण, जोडी नृत्य आणि समूह न्य अस्या स्पर्धा होणार असून या सर्व स्पर्धा रविवार दि. ५ मार्च रोजी सकाळी १०.३० पासून गुजरात भवनाच्या सभागृहात संपन्न होतील. ह्या स्पर्धांचे बक्षिस वितरण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सौ. अर्चना गायकवाड यांच्या हस्ते व गुजराती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुकेश मेहता यांच्या उपस्थितीत रविवार दि. ५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता संपन्न होईल.

## आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी शिवशिंगवाले



**सोलापूर** : दि.१ मध्यवर्ती प्रशासकीय इमारत मधील सर्व अधिकारी व कर्मचारींच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती साजरा करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे नुतन वर्षाच्या अध्यक्ष पदावर नगर भूमापन कार्यालयातील कर्मचारी श्री. उदयसिंग राणूसिंग शिवशिंगवाले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी रघुनाथ बनसोडे, चंद्रकांत चलवादी, भाऊसाहेब चोरमुले, आदी उपस्थित होते. त्यावेळी अध्यक्ष उदयसिंग शिवशिंगवाले म्हणाले की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहाने जयंती साजरी करुन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची विचार धारा सर्व सामान्य नागरिकापर्यंत रुजविण्यात येईल असे शिवशिंगवाले यांनी आपले मोलाच विचार मांडले.

## भांडण सोडवण्यासाठी गेल्यावर फायटरने मारहाण



**सोलापूर** : भांडण सोडवण्यासाठी गेल्यानंतर फायटरने व पट्ट्याने मारहाण करून तरुणास दुखापत केल्याची घटना दि.१ मार्च रोजी रात्री माने दवाखाना सुनील नगर येथे घडली. याप्रकरणी भूमेश प्रभाकर सरगम (वय-२७, रा. सुनील नगर) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून पवन दुडम (वय-२०), जयेश हंचाटे (वय-२३), श्रीकांत संग्गा (वय-२०), निखिल शिंदे (सर्व.रा. सुनील नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी भूमेश सरगम हा सुनील नगर येथे भांडण सोडविण्यासाठी गेला असता, त्याला वरील चौघांनी मारहाण केली. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

## निधन वृत्त

### राज देसाई



**सोलापूर** : सोलापूर शिवाजी चौक येथील पूर्वीचे राजदीप ट्रेडिंग कंपनीचे राज रमनिकभाई देसाई (वय ६५) यांचे पुणे येथे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, वहिनी असे परिवार आहे. नीट कॉम्प्युटर्सचे संदीप देसाई यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

### ईरव्वा हिरेमठ



**सोलापूर** : ईरव्वा शिकामणी हिरेमठ यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. ३ रोजी सायंकाळी ४:३० वाजता निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्ष होते. त्यांच्यावर शनिवारी सकाळी नऊ वाजता माळकवठे येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई नातवंडे असा परीवार आहे. जंगम समाज संघटनेचे दक्षिण सोलापूर अध्यक्ष गजानन हिरेमठ आणि दक्षिण सोलापूर कोतवाल संघटनेचे अध्यक्ष धनय्या हिरेमठ यांच्या त्या मातोश्री होत.

# जिल्ह्यात ३० कारखान्यांची 'धुराडी' झाली 'बंद'

## फेब्रुवारीत हंगामाची समाप्ती; साखर उत्पादन घटणार

**सुराज्य/सोलापूर**



राज्यातील इतर जिल्ह्यांचा साखर हंगाम वेगात सुरू असताना सोलापूर जिल्ह्यात मात्र कारखान्यांचे पट्टे पडू लागले आहेत. राज्यात गाळपाचा उच्चांक करणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील ३७ पैकी ३० कारखान्यांची धुराडी बंद झाली असून उर्वरित ७ कारखाने २० फेब्रुवारी पर्यंत बंद होतील, यंदाच्या हंगामात १७३ लाख मे.टन ऊस गाळपातून १५५ लाख मे.टन साखर उत्पादन करण्यात आले आहे.

राज्यात यंदा आतापर्यंतचा उच्चांक पार करीत २०४, तर सोलापूर जिल्ह्यात ३७ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम घेतला. सोलापूर जिल्ह्याने सोलापूरचाच विक्रम मोडीत काढला आहे. मागील वर्षी राज्यात सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ३३ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम घेतला होता. त्यात यावर्षी वाढ होत संख्या ३७ इतकी झाली आहे.

यंदा उशिरापर्यंत पाऊस पडत राहिल्याने गाळप हंगाम सुरू करताना अडचणी आल्या होत्या. काही जिल्ह्यांत १५ ऑक्टोबरपासून साखर कारखाने सुरू झाले, मात्र सोलापूर जिल्ह्यात ऊस तोडणीसाठी पावसाच्या पाण्याचा अडथळा होता. त्यामुळे ऑक्टोबरअखेर व नोव्हेंबरचा पहिला आठवडा कारखाने सुरू होण्यास लागला. उशिरा कारखाने सुरू होऊनही सोलापूर जिल्ह्यात ऊस शिल्लक राहिला नसल्याने जानेवारी महिन्यात एक कारखाना बंद करावा लागला. ३ मार्चपर्यंत जिल्ह्यातील ३० साखर कारखाने बंद झाले आहेत. राज्यातील इतर जिल्ह्यांतील कारखाने मात्र सुरू असल्याचे साखर आयुक्त कार्यालयाच्या अहवालावरून दिसत आहे. २० मार्चपर्यंत सर्वच कारखान्यांचा पट्टा पडेल अशी माहिती उपविभागीय (साखर) कार्यालयातून देण्यात आली

### उताऱ्यात मोठी घट

मागील वर्षी उसाचा एकरी उतारा सरासरी ४०ते ४५ टन इतका होता. यंदा वजनात मोठी घट झाली आहे. एकरी २० ते २५ टन इतकाच उतारा पडला आहे. अतिवृष्टीने झालेले नुकसान, खताचे वाढते दर,विजेचा प्रश्न यामुळे शेती पिकविणे जिकरीचे झाले आहे. त्यातच उतारा कमी पडल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अडचणी असतानाच कारखानदाराकडून एफआरपी चा कायदा न पाळता तो पायदळी तुडवला जात आहे. सरकार व साखर आयुक्तांनी यावर कायद्यानुसार निर्णय घेऊन शेतकऱ्यांना घामाचा दाम दिला पाहिजे. परंतु असे होताना दिसत नाही.

–बालाजी चव्हाण

(ऊस उत्पादक शेतकरी, माढा)



## मराठी भाषेच्या संवर्धनासाठी दैनंदिन व्यवहारातील वाढावा वापर : डॉ. देशमुख

**सुराज्य/सोलापूर**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी दैनंदिन व्यवहारातील वाढला पाहिजे, अशी अपेक्षा वसुंधरा कला व शास्त्र महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तान-ाजी देशमुख यांनी व्यक्त केली. मराठी भाषा संवर्धन दिनानिमित्त मातोश्री गिरीजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित केलेल्या मराठी भाषा संवर्धन सप्ताहाचा समारोप आणि विज्ञान दिनानिमित्त कार्यक्रम शुक्रवारी प्रा. डॉ. देशमुख यांच्या हस्ते झाला.

यावेळी व्यासपीठावर डॉ. अश्विन बोंदार्डे, प्रा. डॉ. विजयराज जोकारे, कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. समीना नदाफ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मराठी भाषा संवर्धन सप्ताह आणि विज्ञान दिनानिमित्त महाविद्यालयात आयोजित केलेल्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

रजनी पाटील यांनी प्रास्ताविक केले. युक्ता भंडारे यांनी सूत्रसंचालन तर शिवगंगा मेणकाळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. वासंती पांढरे, प्रा. तय्यब शेख, प्रा. गुरव, प्रा. हेडे, प्रा. वर्षा माने, प्रा. रेश्मा जाधव तसेच बीएडच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## व्हीकेजीबी बँकेची 'सद्भावना' कर्जदारांना देणार 'संजीवनी' कर्जमुक्तीसाठी विशेष योजना



**सुराज्य/सोलापूर**

विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या वतीने मागील दोन ते तीन वर्षात कोरोना काळामुळे व अन्य नैसर्गिक कारणाने ज्या शेतकऱ्यांची कृषी कर्ज थकीत झाली होती. त्यांना दिलासा देण्यासाठी व बँकेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विदर्भ कोकण ग्रामीण बँकेने व्हीकेजीबी तडजोड सद्भावना योजना आणि संजीवनी योजना जाहीर केली आहे. ही योजना ३१ मार्च २०२३ पर्यंत चालू राहणार आहे, अशी माहिती सोलापूर विभागातील क्षेत्रीय प्रबंधक रमेश खाडे यांनी दिली.

भारत सरकार, महाराष्ट्र शासन व बँक ऑफ इंडिया यांचा संयुक्त उपक्रम आहे. बँकेचे अध्यक्ष विजय कुमार वर्मा यांनी २८ फेब्रुवारी रोजी बँकेच्या वर्धापनदिनी या योजनेची घोषणा केली. शेतकऱ्यांच्या थकीत कर्जासाठी सवलत देऊन कर्ज परतफेड करणे सुलभ होण्यासाठी बँकेच्या वतीने संजीवनी कर्जमुक्ति योजनादेखिल राबविली जात आहे. ३१ डिसेंबर २०२२ रोजी थकीत झालेल्या शेती कर्जाची खाती या सद्भावना कर्ज मुक्ति योजनेत पात्र आहेत. अशा सर्व पात्र कर्जदारांना शाखाद्वारे संपर्क साधण्यात येत आहे. शेतकऱ्यांना नेहमी दुष्काळ, अतिवृष्टी, दवाखाना अशा वेगवेगळ्या अडचणींना तोंड द्यावे लागते व यामुळे बँकेची कर्ज खाती थकीत जातात अशा शेतकऱ्यांना सवलत देऊन कर्ज खाती बंद करून त्यांना पुन्हा अर्थ सहाय्य करण्याच्या उद्देशाने बँकेने ही योजना सुरु केली आहे.

१ मार्च २०२३ रोजी सुरु करण्यात आलेल्या या योजनेची मुदत ३१ मार्च २०२३ पर्यंत आहे. काही कर्ज खाती मागील आर्थिक वर्षात थकीत झाली आहेत त्या थकीत कर्जदारासाठी बँकेची संजीवनी कर्ज मुक्ती योजना सुरु आहेच.

या योजनेत ही शेतकऱ्यांना भरीव सुट देण्यात येत आहे या योजनेची मुदत ही ३१ मार्च २०२३ पर्यंत आहे. तडजोड रक्कम ही एकरकमी जमा करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस वरिष्ठ व्यवस्थापक संदीप खामकर,कर्ज वसूली विभागाचे व्यवस्थापक दीपक डोळस, अंकिता सिंग, विश्वनाथ आमणे आदी उपस्थित होते.

### बँकेची गौरवास्पद कामगिरी

सध्याच्या आर्थिक वर्षात बँकेने पिक कर्ज वाटपात सर्व बँकांमध्ये सर्वाधिक काम केले आहे. रब्बी व खरीप या दोन्ही हंगामात उद्दिष्ट पूर्ती पेक्षा अधिक काम केले आहे व त्यासाठी जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी यांनी बँकेचा वेळोवेळी गोरव ही केला आहे तसेच जिल्हा उद्योग केंद्राच्या सर्व शासकीय योजेनेची बँकेला दिलेली उद्दिष्टे पूर्ण केली आहेत. स्टँड अप इंडिया कर्ज योजनेत भारत सरकारने दिलेले प्रति शाखा २ कर्जखाती वितरीत करणारी देशपातळीवर विदर्भ कोकण ग्रामीण बँक एकमेव बँक आहे. अटल पेन्शन योजनेत सर्व बँका मध्ये सर्वाधिक सभासद जोडुन बँकेने भारत सरकारचे पहिले बक्षीस मिळविले आहे. दिल्ली येथे पार पडलेल्या कार्यक्रमात बँकेच्या अध्यक्षांना मानचिन्ह देऊन गौरविले आहे. बचत गटातील महिलांच्या व्यवसायाला अधिक आर्थिक पाठबळ मिळावे या उद्देशाने बँक बचत गटातील महीलासाठी मातृशक्ती कर्ज योजना राबवित आहे.

### १७ जिल्ह्यात ३२१ शाखा

विदर्भ कोकण ग्रामीण बँक ही संपूर्णतः शासकीय मालकीची बँक असून १७ जिल्ह्यात ३२१ शाखा कार्यरत आहेत. सोलापूर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सोलापूर जिह्यात ३५ शाखा तर सांगली व सातारा जिल्ह्यात ९ शाखा कार्यरत आहेत.



## ढोर समाजाचा वधूवर मेळावा उत्साहात

**सुराज्य/सोलापूर**

समस्त वीरशैव कक्कया ढोर समाज मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था आयोजित थोर समाज भव्य वधू वर मेळावा व स्नेहसंमेलन छत्रपती रंग भवन सभागृह येथे पार पडले. याचे उद्घाटन माजी महापौर महेश कोठे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल हे होते.

यावेळी समस्त वीरशैव कक्कया महासंघाचे प्रदेश अध्यक्ष निवृत्ती सावळकर, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे, आरटीओ अधिकारी प्रतीक्षा, एन. के. क्षीरसागर, डॉ. किरण देशमुख, शीला शिंदे, युवराज सरवदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी समाजातील सुकन्या इशिका शिंदे हिने साठ कविता लिहिल्याबद्दल तिचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. या मेळाव्यात १०० मुलं ७ ५ मुलींची नोंद झाली. समाजातील महिला प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी मारत आहे असे खरटमल यांनी सांगितले. हा मेळावा यशस्वी करण्याकरिता विठ्ठल होटकर, महादेव इंगळे, गजानन धडके, दिगंबर नारायणकर, सूर्यकांत शेरखाने, छाया नारायणकर, सुमन इंगळे, शारदा शिंदे, सुनीता शेरखाने, शैला शिंदे, रेखा शिंदे, कविता कावळे आदींनी परिश्रम घेतले स्वागत सूर्यकांत शेरखाने यांनीतर सूत्रसंचालन भूमिका वाघमारे यांनी केले तर प्रास्ताविक अध्यक्ष जितेंद्र हटकर यांनी केले. आभार महादेव इंगळे यांनी मानले.

## रस्त्यावर फळ विक्री करणाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर** : रहदारीस अडथळा निर्माण करत रस्त्यात फळ विक्री करणाऱ्या दोघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मोईन यासीन पठाण (वय-२३,रा.भंगी गल्ली,दक्षिण सदर बाझार), अकील बाबासाब पटेल (वय-४०, रा. नम्रता हौसिंग सोसायटी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
आरोग्याधिकारी यांचे कार्यालय, सो.म.न.पा.
mohsolapur@gmail.com

जा.क्र./आअ/-८३३ दि.३/३/२०२३

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**जाहिर प्रसिद्धीकरण**

सो.म.पा.आरोग्य खातेअंतर्गत शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राकरिता निलम नगर व शांती नगर येथे भाडे तत्वावर येथील इमारत घेणेकामी जाहिर प्रसिद्धीकरण अ.क्र.८९१२ सो.म.पा.चे www.solapurcorporation.com या संकेतस्थळावर दि.४/३/२०२३ पासून उपलब्ध आहे.

सही/-
(डॉ.बसवराज सं.लोहारे)
आरोग्याधिकारी
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

पत्ता- इंद्रभुवन पुण्याश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
नगर अभियंता कार्यालय, नागरी कामे.
ई-मेल - smcaecivilworks@gmail.com मो.७७४४००९९७९

दि.०३/०३/२०२३

**जाहिर प्रसिद्धीकरण**

सोलापूर शहरातील सर्व नागरिकांना तसेच शहरातील व शहराबाहेरून येण्याऱ्या सर्व जड वाहतूक वाहनधारकांना सिटी बस, एसटी बस, ट्रक, ट्रेलर इ. वाहनांसाठी सुचित करण्यात येते की, भैय्या चौक ते मरीआई चौक या दरम्यान असणारा रेल्वे ट्रॅक वरील पूल १०० वर्षापूर्वीचा असून तो धोकादायक झालेला आहे. त्यामुळे सदर रेल्वे पुलावरील जड वाहतूक तात्काळ थांबविणे आवश्यक आहे. तरी दि.१०/०३/२०२३ पासून सदर रेल्वे पुलावरून जाणाऱ्या वाहनांची रूंदी मर्यादा विचारात घेता जड वाहनांच्या वाहतुकीस पूर्ण वेळ बंद करण्यात येत आहे. जड वाहनांच्या वाहनधारकांनी अन्य पर्यायी मार्गाचा वापर करून महानगरपालिकेस, वाहतूक पोलीस विभाग व रेल्वे विभागास सहकार्य करावे ही विनंती आहे. तसेच मंगळवेढाकडे जाण्यासाठी जड वाहनधारकांनी भैय्या चौक, एसटी स्टँड, केगांव पुणे रोड वरून विजापूरकडे जाणाऱ्या मार्गावरून मंगळवेढाकडे, कोल्हापूरकडे या रस्त्याचा वापर करावा. तसेच कोल्हापूर मंगळवेढा मार्गावरून येणाऱ्या जड वाहनधारकांनी देखील याच मार्गाचा वापर करावा.

सही/-
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

जा.क्र. ६/आरोग्य/बार/३८४/२०२३
नगरपरिषद कार्यालय, कुर्डुवाडी
दि. ०३/०३/२०२३

**कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी**
**(जि.सोलापूर)**
**जाहीर प्रसिद्धीकरण**

कुर्डुवाडी नगरपरिषद २०२२-२३ मध्ये हाती घेतलेल्या कामाचे जाहीर निविदा मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम | बयाणा रक्कम | कोरी निविदा किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| १ | परांडा रोड जलशुद्धीकरण केंद्रावरती नर्सरी उभारणे. | १ टक्के | २ टक्के करार करतेवेळी, ७ टक्के बिलातून | ३००/- |

१. विहित नमुन्यातील कोरी निविदा न.पा. कार्यालयामध्ये दि. १०/०३/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मिळेल.
२. सर्व कागदपत्रासह रितसर भरलेली निविदा दिनांक १३/०३/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा उघडल्या जातील.
३. प्राप्त निविदापैकी कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नांमंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
४. निविदा भरताना लिफाफा क्र.१ मध्ये सुरक्षित ठेव भरलेली पावती, रजिस्ट्रेशन प्रत, इनकम टॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट, शॉप ॲक्ट लायसन्स, पॅन कार्ड, जीएसटी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे व लिफाफा क्र. २ मध्ये भरलेली निविदा सादर करावीत.
५. लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रे योग्य व पूर्ण असले शिवाय लिफाफा क्र.२ ग्राह्य धरला जाणार नाही व तो समजणेत येईल व उघडण्यात येणार नाही.
६. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यास अनामत रक्कमेत सवलत दिली जाणार नाही.

शिक्का

सही/-
**मुख्याधिकारी**
नगरपरिषद कुर्डुवाडी



**जाहीर समन्स**

**मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर
११३(अ),सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी,सोलापूर-०१
**दि.पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि.,पंढरपूर** ... **अर्जदार**
**४१६३ ब, प्रशासकीय भवन, नवीपेठ, पंढरपूर**
**विरुद्ध**
(खालील तपशिलामध्ये नमुद केलेले थकबाकीदार सभासद) ... **जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १६८९/ २०२२-२३ | ४५५१९/- | १ | **संतोष प्रकाश पवार** रा.नवीपेठ, पंढरपूर |
| | | | २ | **सुनिल चंद्रकांत साळुंखे** रा.घर नं.५८, भक्ती मार्ग,पंढरपूर |
| | | | ३ | **विनोद अरूण पवार** रा.४०७५, नवीपेठ, पंढरपूर |
| २ | १६९०/ २०२२-२३ | १६१०४८/- | १ | **प्रितम बाळासाहेब गावडे** रा.पुळुज, ता.पंढरपूर |
| | | | २ | **सुषमा प्रितम गावडे** रा.पुळुज, ता.पंढरपूर |
| | | | ३ | **निलीमा बाळासाहेब गावडे** रा.पुळुज, ता.पंढरपूर |
| ३ | १६९२/ २०२२-२३ | ४३७१५/- | १ | **रामेश्वरी सर्जेराव शिवशरण** रा.३९९० अ, गाडगेबाबा मठाजवळ, स्टेशन रोड, पंढरपूर |
| ४ | १६९३/ २०२२-२३ | ४२११०/- | २ | **रामेश्वरी संजय शिवशरण** रा.३९९० अ, गाडगेबाबा मठाजवळ, स्टेशन रोड, पंढरपूर |
| ५ | १६९६/ २०२२-२३ | ४६३६६/- | १ | **वैभव किसन गायकवाड** रा.संतपेठ, पंढरपूर |
| | | | ३ | **अक्षय अनिल कदम** रा.महापूर चाळ, पंढरपूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वार मंगळवार, दि.२१/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.३/३/२०२३ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

सही/-
**उपनिबंधक**
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी
बँक्स् को.ऑप.असोसिएशन लि. सोलापूर



## वेळापूर इंग्लिश स्कूलवर दहावीच्या परीक्षेस शांततेत सुरुवात

**वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथील इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशाला उपकेंद्रावर दहावीच्या परीक्षेस शांततेत सुरुवात झाली आहे. या उपकेंद्रावर २५० विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षा केंद्रावर दहावीच्या परीक्षेसाठी उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष व शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष मिलिंद सरतापे, शिक्षक पालक संघाचे सहसचिव उमेश पोरे, व पालक वर्ग यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना इंग्लिश स्कूल चे प्राचार्य व परीक्षा उपकेंद्राचे प्रमुख आर बी पवार यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर घ्यावयाची काळजी व कॉपीमुक्त अभियान द्वारे विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा द्यावी असे आवाहन केले. प्रशालेचे उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक पठाण शिवशरण, सत्यजित बारंगुळे, भास्कर बागल यांनी परीक्षा उपकेंद्रावर परीक्षेसाठी योग्य असे नियोजन केले. उपकेंद्रावर वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे.

## पिलीव परिसरातील लंपी रोग आटोक्यात : डॉ. शेंडगे

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या गावातील लंपी रोग पुर्णपणे आटोक्यात आला असल्याची माहिती पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.शेंडगे यांनी दिली. पिलीव येथील साठेनगर भागात सध्या फक्त एकच गाई लंपीग्रस्त आहे. बाकी पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी या गावातील लंपी रोग पुर्णपणे आटोक्यात आला असल्याचे तसेच लंपी काळात दगावलेल्या ३३ प्रस्ताव शासनाकडे पाठविले आहेत.सध्या पिलीव पशुवैद्यकीय दवाखान्यात सहहयाक पशुधन अधिकारी किंवा एल.एस.एस व दोन शिपाई पदाच्या जागा रिक्त आहेत. यामुळे सध्या एकाच अधिकाऱ्यांवर कामाचा भार आहे. पिलीव पशुवैद्यकीय दवाखान्या अंतर्गत पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी गावात ६००० गाई, म्हशी एवढी जनावरे आहेत. सर्व पशुपालकांनी शासनाच्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या सोयी सुविधांचा लाभ घ्यावा. या सर्व सुविधा पुर्णपणे मोफत आहेत. आपण पशुपालकांना चांगल्या सुविधा देणयास कटीबद्ध असल्याचे पशुधन विकास अधिकारी डॉ.शेंडगे यांनी सांगितले.

## घरफोडी व मोटारसायकली चोरी करणारे तिघे सराईत अटकेत

**सोलापूर** : घरफोडी व मोटरसायकली चोरी करणारे तिघा सराईत गुन्हेगारांना शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक महाडिक हे घरफोडी व मोटरसायकल चोरींचा तपास करत असताना गुप्त मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी अभिलेखावरील विजय विष्णु कांबळे (वय-२२.रा.जगताप हॉस्पीटलच्या पाठीमागे, गंगा नगर, हब्बु बस्ती, सोलापुर), कुणाल दत्ता खरात (वय-२२, रा.हब्बू वस्तीर) व सदानंद रामकृष्ण यादव (वय-३०, रा.हब्बू वस्ती) यांना अटक केली असता, त्यांचेकडे चोरी केलेली युनिकॉर्न मोटार सायकल मिळुन आली. फौजदार चावडी पोलीस ठाणे,तालुका पोलीस ठाणे,जेलरोड पोलीस ठाणे व जोडभावी पेठ पोलीस ठाणे अशा ठिकाणी घरफोडी व मोटरसायकल चोरींचे गुन्हे नोंद होते. आरोपीच्या ताब्यातून मोटरसायकली, रोख रक्कम, लोखंडी साहित्य असा एकूण ७५ हजार ४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# 'पांडुरंग' ऊस बेण्यास अनुदान देणारा राज्यातील पहिला साखर कारखाना : भोईटे

**सुराज्य/श्रीपूर**

**आज साखर उद्योगा पुढे ऊस उत्पादन वाढीची समस्या जाणवत असून बदलत्या वातवरणामुळे ऊसाची वाढ व वजन यात कमालीची घट होत आहे त्यामुळे कारखान्यांचा गळीत हंगाम कमी होत आहे ही चिंताजनक बाब आहे. यावर श्रीपूर येथिल पांडूरग सहकारी साखर कारखान्याने खोडवा व निडवा ऊस पिकास जास्तीचा दर देणे व ऊस लागवडीस शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ऊस बेण्यासाठी जे अनुदान चालु केले आहे. राज्यातील पहिला प्रयोग असून याचा चांगाला परिणाम दिसून येईल असे गौरवोद्गार व्ही.एस. आयचे आर.बी.भोईटे यांनी व्यक्त केले.**





### ३५ लाख ऊस रोपांचे वाटप

गत दोन वर्षा उसाचे वजन घटत असून त्याचा फटका साखर उद्योगास ऊसाची कमतरता जाणवत असल्याने बसत आहे उद्योगाचे दृष्टीने ही गंभीर बाब आहे. यावर खोडवा व निडवा पिक घेणे हा शेतकऱ्यांसाठी चांगला पर्याय आहे याची चांगली जपणूक केली तर ऊस उत्पादकांना कमी खर्चात जास्त उत्पादन मिळू शकते याचा जसा शेतकऱ्यांना लाभ होणार आहे तसा कारखाने पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी होणार असल्याने कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक व संचालक मंडळाच्या मार्गदर्शना प्रमाणे कारखान्याने सुमारे ३५ लाख ऊस रोपांचे वितरण केले आहे . या बरोबरच खोडवा पिकास १०० रु जास्त दर देण्यात येणार आहे याचा लाभ घेवून सभासद आपले उत्पन्न वाढवू शकतात.

**- डॉ.यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक**

पांडुरंग कारखान्यावर खोडवा व निडवा ऊस पिकाची लागवड व संवर्धन या विषया वर काररखाना स्थळावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रसंगी ते बोलत होते. प्रथम बी.एस.भोईटे, अभिनंदन पाटील, जाधव, पांडुरंगचे उपाध्यक्ष कैलास खुळे, जेष्ठ संचालक दिनकरभाऊ मोरे, दिलिपराव चव्हाण, दाजी पाटील, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांचे हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रथम प्रास्ताविकात डॉ यशवंत कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत करून कै. सुधाकरपंत परिचारक यांच्या मार्गदर्शक तत्वांचा आदर्श ठेवून पांडुरग कारखान्याने शेतकरी, कष्टकरी यांचे हिताचा विचार केला यास अनुसरून कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांना बेणे अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून सर्व सभासदांनी या साठी आग्रही राहून याचा लाभ घेण्याचे सभासदांना आवाहन केले. यावेळी व्ही एस आय चे अभिनंदन पाटील यांनी खोडवा व निडवा ऊस पिकाची तंज्ञाच्या मार्गदर्शना नुसार ऊस पिक जोपासले तर कमालीचे उत्पादन कमी खर्चात मिळते असे सांगितले याबरोबरच जाधव यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी कारखान्याचे प्रोडक्शन मॅनेजर एम.आर. कुलकर्णी, मुख्य शेती अधिकारी कुमठेकर, ऊस विकासअधिकारी सोमनाथ भालेकर, संगणक व्यवस्थापक तानाजी भोसले, इलेक्ट्रिकचे सचिन विभुते सेक्रेटरी भिमराव बाबर, ईस्टेट मॅनेजर रमेश गाजरे सभासद शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**नातेपुते** : सहकार महर्षी शंकरराव मोहिते -पाटील महाविद्यालय येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीकर परिषदेचे कार्याध्यक्ष तथा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष व ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सदस्य महाविद्यालयाचे संचालक डॉ. धवलसिंह मोहिते -पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक शिक्षक तर कर्मचारी असे एकूण ८७ रक्तदात्यांनी रक्तदान करून डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच महिला मुलींची हिमोग्लोबिन तपासणी व विद्यार्थ्यांची आरोग्याची तपासणी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून करून घेण्यात आली. सदर वरील कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला असून प्राध्यापक डॉ. बाळासाहेब निकम, प्रा.जगदीश मुळीक, प्रा.सुहास नलवडे, प्रा. उत्तम सावंत, प्रा. राजेंद्र खंदारे, प्रा.डी.एम. साळवे, प्रा.आर.ए. शेख, प्रा. सोपान सुरवसे, प्रा.मोहन सावंत, प्रा. श्रीकांत पवार प्रा.डॉ. दत्तात्रय शहाणे, प्रा.डॉ. दत्तात्रय थोरात, प्रा. किरण मेणकुदळे, प्रा. संभाजी बनसोडे, प्रा.डॉ. सुनिता सुर्यवंशी, प्रा.पुष्पा सरस्ते, प्रा. हसन मोगल, प्रा. नारायण माने, प्रा. बापुराव वाघमोडे, प्रा.डी.के. साठे, प्रा. कुमारी वाघमोडे, प्रा. वैभव गवळी यांनी कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय नातेपुते माजी विद्यार्थी कल्याणकारी संस्था यांच्या वतीने माजी विद्यार्थी यांचा स्नेह मेळावा रविवार दिनांक ५ मार्च २०२३ रोजी होणार आहे कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या चेअर पर्सन तसेच सिनेट व व्यवस्थापन परिषद पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाच्या पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते पाटील व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य कुस्तीकर परिषदेचे कार्याध्यक्ष राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष व ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सदस्य डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील उपस्थित राहणार आहेत व या मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत मेळाव्याची संपूर्ण तयारी झाली आहे.

**- प्रा.डॉ.चंद्रकांत कोळेकर**
शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते



## वेळेत नुकसान भरपाई न मिळाल्यास वेळापुरातील गाळेधारकांचा चक्री उपोषणाचा इशारा

**सुराज्य/वेळापूर**

वेळापूर उड्डाणपूला शेजारील दक्षिण बाजूच्या गाळेधारक-टपरीधारक यांना नुकसान भरपाई मिळेपर्यंत महामार्गाचे काम बंद ठेवावे अशी मागणी गाळेधारकांनी प्रांतअधिकारी कार्यालयाला दिलेल्या निवेदनात केली आहे. वेळेत नुकसान भरपाई न मिळाल्यास ६ मार्च पासून प्रांत कार्यालयासमोर चक्री उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.

वेळापूर गावामध्ये पालखी महामार्ग ९६५ चे काम अंतिम टप्प्यात आले आहे. वेळापूर गावातून उड्डाणपूलाचे काम चालू आहे. उड्डाणपूला शेजारील दक्षिण बाजूच्या गाळेधारक, टपरी धारक यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. नुकसान भरपाई मिळावी यासाठी वारंवार प्रांत कार्यालयाशी तोंडी चर्चा करून लेखी पत्र व्यवहार करून या संदर्भामध्ये दि. २१/०१/२०२३ रोजी रस्ता रोको आंदोलन केले. परंतु प्रांत अधिकारी व संबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

जोपर्यंत गाळेधारकांना व टपरी धारकांना नुकसान भरपाई मिळत नाही तोपर्यंत राष्ट्रीय महामार्गाचे काम बंद ठेवण्यात यावे. अधिकग्रहण जागेचा निवाडा न केल्याने बाधितांना सर्वांना नोटिसा दिल्या नाही तर सर्वांना नोटीसा द्याव्यात अन्यथा गाळेधारक टपरीधारक गावकरी यांच्यावतीने ६ मार्च पासून प्रांताधिकारी कार्यालयासमोर चक्री उपोषण आंदोलन करणार असल्याचे निवेदन प्रांताधिकारी यांना देण्यात आले आहे. आरपीआय आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, आंबेडकरी चळवळीचे नेते विजय बनसोडे, भाजपा मोर्चा तालुका सरचिटणीस अजित साठे, रणजित सरवदे, प्रदिप सरवदे, नारायण साठे, प्रभाकर भगत, इलाई तांबोळी, इकबाल आतार, विष्णू कुदळे, नवनाथ माने, फिरोज मुलाणी, समाधान पनासे, सद्दाम तांबोळी, आलम बागवान, मझीदुल्हा मुलाणी इत्यादीं उपस्थित होते.



## जिजाऊ ब्रिगेडने नेहमीच सामाजिक जबाबदारी जपली : लावंड

### ऊसतोड कामगार, बालकांना जिजाऊ ब्रिगेडची मदत

**सुराज्य/अकलूज**

जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून नेहमीच सामाजिक जबाबदारी जपली आहे तळागाळातील घटकांना न्याय देण्याचा नेहमी प्रयत्न या संघटनेच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत, असे प्रतिपादन जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षा मनोरमा लावंड यांनी व्यक्त केले.

मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड पंढरपूर सोलापूर विभाग अकलूजच्या वतीने आदिवासी भागातील ऊसतोड करणारे लोक महिला व बालक यांना खाऊ, साड्या, कपडे व चपला वाटप करण्यात आले. जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष सुरजाताई बोबडे व शिवमती मनीषाताई जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या तालुका अध्यक्ष शिवमती मनोरमा लावंड, मनीषा गायकवाड, माळशिरस तालुका उपाध्यक्ष शिवमती शुभांगी क्षीरसागर, अकलूज शहराध्यक्ष शिवमती शारदा चव्हाण, शहर कार्याध्यक्ष शिवमती संगीता जगदाळे, शिवमती सुवर्णा गोरवे, प्रसिद्धीप्रमुख शिवमती वंदना पवार व उषा काजळे या उपस्थित होत्या. तसेच यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या.

## हॉर्न वाजवल्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर** : निलम नगर येथे रस्त्याच्या कडेला फिर्यादी सिध्दाराम चंदप्पा बाचा (वय-४२, रा.निलम नगर, बसवेश्वर चौक) हे थांबलेले असताना आरोपी शशिकांत शंकर दोडमणी हा पाठीमागून येऊन फिर्यादीला हॉर्न वाजवून बाजूला सरक म्हणत शिवीगाळ करत बाचा यांना मारहाण केली.

भांडण सोडवण्यासाठी फिर्यादीची पत्नी आल्यांनतर त्यांनाही शिवीगाळ केली, अशा आशयाची फिर्याद बाचा यांनी दिली. या फिर्यादीवरून दोडमनी याच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलीस नाईक कटके हे करत आहेत.

## रद्द झालेल्या घरकूलावरुन राष्ट्रवादीच्या दोन गटात पत्रक युध्द

**रमेश बारसकर व प्रमोद डोके आमने-सामने**

**मोहोळ** : मोहोळ नगर परिषदेतील पंतप्रधान आवास योजनेच्या मोहोळ शहरातील घरकूलाबाबत मोहोळ शहरातील वातावरणात पत्रकवॉर राष्ट्रवादी काँग्रेस च्या दोन गटात चांगलाच रंगू लागला.

मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी २ मार्चला पत्रक काढत मोहोळ शहराच्या तोंडातील घास कोण पळवून नेत आहे? मोहोळची घरकूल रद्द झाली अन अनगरची मंजूर झाली असे सांगत त्याविरोधात आठ मार्चला आसूड आदोलन रमेश बारसकर यांनी हाती घेतले आहे रमेश बारसकर यानी काढलेल्या पत्रकात मोहोळ शहरात प्रधानमंत्री आवास योजनेतील मंजूर झालेले ५७९ घरकूल रदद करण्यात आले तर अनगर नगर पंचायतचे ४७० घरकूल नव्याने मंजूर करण्यात आले यामागचे गौडबंगाल काय आहे ? असा प्रश्न केला आहे. या प्रकरणात अनगरकडे बोट दाखवले आहे. दुसऱ्या बाजूने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधीकारी व मोहोळ चे माजी उपनगराध्यक्ष प्रमोद डोके यांनी तीन मार्चला नवीन पत्रक काढले यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मोहोळ शहराच्या वतीने ६ मार्चला धरणे ओदोलन पुकारल असून या ५७९ रदद झालेल्या घरकुलाला मुदत वाढ मिळावी अशी मागणी केली आहे. यात शासनाने परिपत्रक काढून ज्यांना मंजूरी मिळून पण नगर परिषदेने वारंवार लेखी नोटीस देवूनही घरकुलाचे बांधकाम चालू केले नाही. अशी ५७९ रदद करण्यात आली आहेत. त्या घरकुलांना मुदत वाढ मिळावी अशी मागणी करणारे पत्रक तीन मार्चला प्रसिध करण्यात आले. यात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गटनेते माजी उपनगराध्यक्ष प्रमोद डोके यांचा फोटो असून जिल्ह्यातील तालुका निहाय मंजूर घरकूल व तालुका निहाय रदद झालेल्या घरकुलांची आकडेवारी ही त्यावर छापली आहे.

सुराज्य सोलापूर Classified

विवाह विषयक

वधु - २६, ५.३, गोरी, १२ वी, शिवणकाम. हिंदु मराठा, वडील नाहीत. मुलगी दत्तक आहे. शेती ४ एकर, एकुलती एक मुलीकरीता सर्वजातीय वर चालेल.मो.7517049173/ 8446068427 (090323)

विवाह विषयक


सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : 9763624364, 7410553871 (040323)



### निराशेचे मळभ हटले

# अदानींसाठी गुड न्यूज, १२० मिनिटांत कोटींची कमाई

- हिंडेनबर्गच्या हल्ल्यानंतर अदानी समूह येत आहे पूर्वपदावर
- बाजारात अदानी शेअर्सने शुक्रवारी जोरदार उसळी घेतली
- गौतम अदानींची संपत्ती गेल्या तीन दिवसात रॉकेट स्पीडने वाढली



सुराज्य/मुंबई

**अमेरिकन शॉर्ट सेलर कंपनी हिंडेनबर्गच्या दणक्यानंतर संकटात सापडलेला अदानी समूह आता हळूहळू सावरत आहे. अदानी समूहातील कंपन्यांचे शेअर्स पुन्हा एकदा वेगाने व्यवहारात करताना दिसत असून गेल्या चार दिवसांपासून अदानींच्या शेअर्सनी रॉकेट स्पीड पकडला आहे. मागील एक महिन्यातील घसरणीनंतर शेअर्समध्ये नुकत्याच झालेल्या रिकव्हरीनंतर आता अदानीचे मार्केट कॅप १ लाख कोटींच्या वर उंचावले आहे. त्याचबरोबर गौतम अदानी यांची संपत्तीही वेगाने वाढत असून गेल्या काही दिवसांत गौतम अदानी यांच्या संपत्तीत ११ अब्ज डॉलरची वाढ झाली आहे.**

हिंडेनबर्गच्या नकारात्मक अहवालानंतर अदानी शेअर्समध्ये जोरदार पडझड झाली, ज्यामुळे गौतम अदानी यांची एकूण नेटवर्थ ३१ अब्ज डॉलरवर घसरली आणि एकावेळी जगातील तिसरे अतिश्रीमंत अदानी श्रीमंतांच्या टॉप-३० यादीतूनही बाहेर फेकले गेले.

**गौतम अदानी पुन्हा अव्वल**

अदानी समूहातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूकदारांचा विश्वास परत येत असताना याचा प्रभाव गौतम अदानी यांच्या संपत्तीवरही दिसत आहे. बाजाराच्या शेवटच्या दिवसाच्या बाजार सत्रात म्हणजे शुक्रवारी गौतम अदानी फोर्ब्सच्या रिअल टाइम अब्जाधीशांच्या निर्देशांकात सर्वाधिक संपत्ती कमावणाऱ्यांच्या यादीत अव्वल ठरले.

विशेष म्हणजे यापूर्वी २ मार्च रोजी देखील अदानी टॉप गेनर ठरले होते. तर आज त्यांनी बाजाराच्या सुरुवातीला फक्त दोन तासांत ४.८ अब्ज म्हणजेच सुमारे ३,९४,७६,४०,००,०० रुपये कमावले आहेत.

**श्रीमंतांच्या यादीत अदानींची आगेकूच**

शेअर्समधील सकारात्मक वाढीमुळे अदानी आता जगातील श्रीमंतांच्या यादीतही वरच्या दिशेने वाटचाल करत आहेत. गौतम अदानी केवळ तीन दिवसात त्यांनी ३७व्या क्रमांकावरून २६व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. त्यांनी तीन व्यापार दिवसात सुमारे ११ अब्जची कमाई केली असून त्यांना आपले जुने स्थान मिळवण्यासाठी आणखी दीर्घ कालावधी लागेल.

दुसरीकडे, अदानींच्या शेअर्समधील तेजीमुळे कंपनीचे मार्केट कॅपही एका दिवसात १ लाख कोटींवर झेपावले आहेत. अलीकडेच अमेरिकन कंपनी GQG पार्टनर्सने अदानी ग्रुपच्या चार कंपन्यांचे १७ कोटीहून अधिक शेअर्स खरेदी केले असून यासाठी कंपनीने १५ हजार ४४९ कोटी रुपयांची गुंतवणूक केली, ही बातमी समोर आल्यावर अदानींच्या शेअर्सनी तेजीने व्यवहारास सुरुवात केली.

**अदानी समूहाचे शेअर्स**

अदानी पॉवर १६९.४५ रुपये, अदानी ट्रान्समिशन ७४३.७५ रुपये, अदानी ग्रीन एनर्जी ५६२ रुपये, अदानी टोटल गॅस ७८१.८५ रुपये, अदानी विल्मर ४१८.३० रुपये आणि एनडीटीव्ही २२०.१० रुपये या सर्व शेअर्सने पाच टक्क्यांच्या वाढीसह अप्पर सर्किटला स्पर्श केला. समूहाची प्रमुख कंपनी अदानी एंटरप्रायझेस बीएसईवर १०.२० टक्क्यांनी वाढून १७७०.६० रुपयांवर अदानी पोर्ट्स ६.१९ टक्क्यांनी वाढून ६६१.८० रुपयांवर, एसीसी ३.२६ टक्क्यांनी १८६०.७५ रुपयांच्या वाढीसह आणि अंबुजा २४.३८ रुपयांवर व्यवहार करत असून त्यात ३.६१ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

## खाद्यतेलाचे दर १५ ते २० रुपयांनी होणार कमी

सुराज्य/मुंबई

**खाद्यतेल लवकरच १५ ते २० रुपये स्वस्त होण्याची आशा निर्माण झाली आहे. मलेशियाहून येणाऱ्या पामतेल आयातीत प्रति टन १८ हजार रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे पामतेल स्वस्त होऊन त्याचा उर्वरित तेलांवर सकारात्मक परिणाम होण्याची आशा व्यक्त करण्यात आली आहे.**



भारत हा जगातील सर्वाधिक खाद्यतेल वापरकर्ता देश आहे. परंतु भारतात मागणीच्या जेमतेम १५ टक्के तेलाचे उत्पादन होते. त्यामुळेच भारताकडून दरवर्षी सुमारे ८० टक्के तेल आयात केले जाते. या ८० टक्क्यांमध्ये सर्वाधिक ६५ टक्के पामतेलाचा समावेश असतो. त्यापाठोपाठ १८ ते २२ टक्के सूर्यफुल तेलाचा समावेश असतो. भारतात जितके सूर्यफुल तेलाची आयात होते, त्यातील ८० टक्के युक्रेनहून २० टक्के रशियाहून येते.

वर्षभरापासून सुरू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धाचा या आयातीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे सूर्यफुलाऐवजी पामतेल, राइसब्रान या अन्य तेलांची मागणी वाढली आहे. परिणामी मागील वर्षीच्या सुरुवातीला सरासरी १३० ते १४० रुपये प्रति लिटरवर असलेल्या खाद्यतेलाचे दर आता सरासरी १६० रुपयांच्या घरात गेले आहेत. तेथे ते स्थिर झाले आहेत. आता मात्र पामतेल आयात स्वस्त होत आहे.

अखिल भारतीय खाद्यतेल महासंघाचे अध्यक्ष शंकर ठक्कर यांनी सांगितले की, 'भारतात पामतेलाची आयात इंडोनेशिया व मलेशियाहून होते. ही जवळपास निम्मी-निम्मी असते. मलेशियात पाम शेतीचा मजुरी खर्च कमी झाला आहे. त्यामुळेच या तेलाची भारतातील आयातही मलेशियन चलनानुसार सुमारे १ हजार रिंगिट प्रति टनाने स्वस्त झाली आहे. त्यामुळेच पामतेल स्वस्ताईची चिन्हे असून ते सर्वाधिक आयात होणारे खाद्यतेल असल्याने त्याचे सकारात्मक परिणाम अन्य तेलांवरदेखील होतील, अशी आशा आहे.'

## प्रकृती खालावल्याने सोनिया रुग्णालयात

**सुराज्य/नवी दिल्ली :** काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांना गुरुवारी सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले. ताप आल्याने सोनिया गांधी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहेत. याआधी जानेवारी महिन्यात सोनिया गांधी यांना श्वसनाचा त्रास झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

७६ वर्षीय सोनिया गांधी यांना गुरुवारी ताप आला. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. डॉक्टरांचे पथक सोनिया गांधी यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहेत, असे सर गंगाराम रुग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाने सांगितले.

## कफ सिरफ तयार करणाऱ्या २७ कंपन्या चौकशीच्या फेऱ्यात

सुराज्य/नवी दिल्ली

देशातून निर्यात झालेल्या सदोष कफसीरपमधील हानीकारक घटकद्रव्यांमुळे ६६ मुलांचा मृत्यू झाल्याची शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने निदर्शनास आणून दिली. त्यानंतर राज्यात तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या औषधाच्या गुणवत्ता तपासण्या (स्टॅबिलिटी स्टेट) झाल्यानंतरच जागतिक बाजारपेठेत पाठवणे बंधनकारक असताना राज्यातील २०० औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी दोन हजारपेक्षा अधिक औषधे कोणत्याही प्रकारच्या स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न



घेताच निर्यात होत असल्याचे फेब्रुवारी, २०२३ मध्ये आढळून आले. त्यामुळे राज्यातील या २०० औषध उत्पादकांची सखोल चौकशी करून त्यांचे परवाने रद्द करून कारवाई करण्याची मागणी करीत भाजपा आमदार ॲड. आशिष शेलार यांनी लक्षवेधी सुचना उपस्थितीत केली होती.

ही घटना गंभीर असून या प्रकरणी सदर कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी आमदार ॲड. आशिष शेलार यांनी केली आहे.

## नागपुरात विविध ठिकाणी ईडीचे छापे

**सुराज्य/नागपूर :** महाराष्ट्रात ईडी पुन्हा सक्रीय झाले असून नागपुरात छापेमारी केलीय. नागपुरमधील एक सुप्रसिद्ध कंपनीच्या मालकाच्या घरी ही छापेमारी करण्यात आलीय. सकाळच्या सुमारास ईडीने ही छापेमारी केली.

आर संदेश ग्रुपचे मालक रामदेव ऊर्फ रम्मू अग्रवाल यांचे घर आणि कार्यालयात ईडीचे पथक धडकले. या पथकाने रम्मू अग्रवाल यांच्यासह आणखी काही व्यावसायिकांवर ईडीची कारवाई सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. नागपूरच्या कॅनल रोडवरील गौरी हाइट्स, रामदास पेठ परिसरातील रम्मू अग्रवाल यांच्या कार्यालयात कारवाई सुरू आहे. आर संदेश ग्रुपचे बांधकाम आणि औषध यासह अनेक व्यवसाय आहेत.

आर संदेश ग्रुपच्या जमीन खरेदी प्रकरणी हे छापे असल्याची माहिती समोर येत आहे. नागपुरात अनेक मोक्याच्या ठिकाणी आर संदेश ग्रुपने जमिनी खरेदी केल्या आहेत. यामुळे चौकशीसाठी ईडीचे पथक शुक्रवारी पहाटेच पोहचले. ईडीचे अधिकाऱ्यांनी अद्याप याबद्दल माहिती दिलेली नाहीये.

## आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेचे आयोजन

**सुराज्य/पुणे :** चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटतर्फे ७ व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषद २०२३ चे पुण्यात आयोजन करण्यात आले आहे.

मधुमेह असणाऱ्या रूग्णांची संख्या आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या गुंतागुंतींचा सामना करण्यासाठी योग्य उपाययोजना जाणून घेण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून चिन्मय मिशनचे ग्लोबल हेड स्वामी स्वरूपानंदजी आणि सन्माननीय अतिथी म्हणून नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणेचे संचालक डॉ. आशिष लेले हे उपस्थित असतील. १० ते १२ मार्च २०२३ दरम्यान होणाऱ्या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेत २००० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

## पोलीस अधिकाऱ्याची लेक ते आमदार

सुराज्य/मुंबई

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पाठीराख्या ते आमदार असा प्रवास नवनिर्वाचित आमदार अश्विनी जगताप यांचा दिसून येतो. संयमी बोलणे, धीरोदत्त वागणे आणि साधे राहणे ही त्यांची त्रिसूत्री म्हणता येईल.



पुण्याच्या हुजूरपागा शाळेत दहावीचे शिक्षण घेतलेल्या अश्विनी निवृत्त पोलिस अधिकाऱ्याच्या कन्या आहेत. आमदार लक्ष्मण जगताप यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्या पिंपळे गुरवच्या सूनबाई झाल्या. महापालिका, विधान परिषद, विधानसभा, लोकसभा या निवडणुकांत त्या 'भाऊं'च्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांच्या निर्णयात सहभागी झाल्या. पिंपळे गुरव आणि सांगवी परिसरातील महिला बचत गटांना एकत्रित करून सामाजिक कार्यात सक्रिय राहिल्या. पवनाथडी जत्रेच्या आयोजनात त्यांचा पुढाकार असतो.

भाऊंच्या निधनानंतर उमेदवारीबाबत जगताप कुटुंबीयांमध्ये वाद निर्माण झाल्याच्या वावड्या उठल्या. त्यानंतर अश्विनी जगताप यांनी स्वतः खुलासा करून वाद नसल्याचा निर्वाळा दिला. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्या प्रथमच निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या. त्यानंतर प्रत्येक बैठका, कोपरा सभा, भव्य जाहीर सभा यांतून त्यांनी 'भाऊं'चे अर्धवट स्वप्न पूर्ण करायचे आहे. पिंपरी-चिंचवडला मेट्रो सिटी करायचे आहे,' असे भावनात्मक आवाहन केले. त्यांचा हा मुद्दा अखेरपर्यंत कायम राहिला.

जगताप कुटुंबाबाबत त्यांनी घेतलेली भूमिकाही चर्चेत राहिली. गेल्या ३० वर्षांपासून आमचे कुटुंब एकत्र आहे. शंकरशेठ मला मुलासारखे आहेत. आम्ही एक आहोत आणि एकत्रच राहणार आहोत,' हे त्यांनी आवर्जून म्हटले. त्यामुळेच पिंपळे गुरव भागात त्यांना सर्वाधिक मताधिक्य मिळाले. या भागातून विक्रमी मतांची भाऊंची परंपरा यंदाही कायम राहिल्याचे स्पष्ट झाले.

## सिन्नरच्या सहाय्यक निबंधकास लाच घेताना पकडले

**सुराज्य/सिन्नर :** येथील सहकार विभागातील सहाय्यक निबंधक एकनाथ पाटील यास १५,५०० रुपयांची लाच घेताना गुरुवारी (दि. २) रंगेहाथ पकडण्यात आले.

तालुक्यातील पाथरे येथील एका पतसंस्थेच्या कर्मचाऱ्याने १७ कर्जदारांचे कलम १०१ नुसार वसुली दाखले मिळण्यासाठी पाटील याच्याकडे प्रस्ताव दाखल केला होता. पाटील याने प्रत्येक प्रस्तावाचे दोन हजार रुपये याप्रमाणे ३४ हजार रुपयांची मागणी संबंधित कर्मचाऱ्याकडे केली होती. यात २५ हजार ५०० रुपये देण्याचे संबंधित सेवकाने मान्य करून दि. २६ फेब्रुवारी रोजी दहा हजार रुपये पाटील यास दिले. सदर दाखले तयार झाल्यानंतर उर्वरित रक्कम १५ हजार ५०० रुपये देत नसल्याने पाटील याने दाखल्यांवर सही करण्यास नकार दिला. त्यानंतर संबंधित सेवकाने बुधवारी (दि. १) लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानंतर बुधवारी संबंधित सेवकाने पुन्हा पाटील याची भेट घेऊन उर्वरित रक्कम उद्या देतो, असे सांगितले. त्यानुसार गुरुवारी (दि. २) दुपारी सव्वा वाजेच्या सुमारास सरकारी पंचांसमोरच पाटील याने १५ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारली.

## अंगणवाडी सेविकांच्या मानधनावरून खडाजंगी

**सभागृहात विरोधक-सत्ताधारी आमने सामने**

सुराज्य/मुंबई

**राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याच्या मुद्द्यावरून विधानसभेत आज प्रचंड गदारोळ झाला. अंगणवाडी सेविकांच्या मानधनाबाबत गेल्या अनेक वर्षांपासून प्रश्न प्रलंबित आहे. नुकताच अंगणवाडी सेविकांनी मुंबईत आंदोलनही केले. यावरून विधानसभेत जवळपास १०० आमदारांनी प्रश्न मांडले. हे प्रश्न मांडताना सरकार आणि विरोधक यांच्यात खडजंगी पाहायला मिळाली.**



अंगणवाडी सेविकांच्या मानधनात २० टक्क्यांची वाढ केल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. ही आतापर्यंतची सर्वात मोठी वाढ असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं. मात्र, यावरून अजित पवारांनी हरकत घेतली. शेतावर जाणाऱ्या शेतमजुरांनाही दिवसाला ३०० रुपयांची मजुरी मिळते. म्हणजे, महिन्याला ते दहा हजार रुपये मिळतात. मग शिक्षण, आरोग्य क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या सेविकांना अल्प मानधन का मिळते याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे अंगणवाडी सेविकांना १५ हजार रुपये आणि मदतनिसांना १० हजार मानधन देण्याची मागणी अजित पवारांनी केली. यावरून मंगल प्रभात लोढा यांनी २० टक्के मानधन वाढीचा पुनरूच्चार केला. ही आतापर्यंतची सर्वाधिक मानधन वाढ असल्याचंही ते म्हणाले. तसंच, येत्या काळात अजित पवारांच्या मागणीचा विचार टप्प्याटप्प्याने केला जाईल, असंही मंगल प्रभात लोढा म्हणाले.

# अजित पवार सहशिवसेनाप्रमुख होणार

## फडणवीसांच्या वक्तव्याने शिंदेंही चकीत

सुराज्य/मुंबई

**विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा पाचवा दिवस विविध मुद्द्यांवरून गाजतोय. विरोधी पक्ष, सत्ताधाऱ्यांनी एकमेकांवर आगपाखड केली. राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी उत्तर दिलं. यावेळी त्यांनी तुफान फटकेबाजी केली. विरोधकांवर टीका करताना त्यांच्यातील राजकीय स्टॅण्डअप कॉमेडिअनही समोर आला. खासकरून त्यांनी विरोधी पक्षनेते अजित पवारांना टार्गेट केलं. यावरूनच देवेंद्र फडणवीसांनी अजित पवारांना सहशिवसेनाप्रमुख म्हणून संबोधलं. मात्र, त्यांचं हेच वाक्य घेरत एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा हशा पिकवला.**





अजित पवार ठाकरे गटाची सक्षम बाजू घेताना दिसत आहेत. यावरून एकनाथ शिंदे यांनी त्यांना कोपरखळी दिली. तेवढ्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'ते आता सहशिवसेनाप्रमुख बनतील. तेवढ्यात एकनाथ शिंदेनीही त्यांना अनुमोदन दिलं. मात्र, शिवसेना आता आपल्या ताब्यात आल्याचं लागलीच शिंदेंना लक्षात आलं. त्यामुळे शिवसेना आता आपल्या ताब्यात आलीय, त्यामुळे अजित पवार सहशिवसेनाप्रमुख बनू शकत नाहीत, असं म्हणाले. त्यामुळे सभागृहात पुन्हा खळखळाट झाला.'

दरम्यान, राज्यविधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेवर उत्तर देत आहेत. उत्तराच्या सुरुवातीपासूनच त्यांनी हसत खेळत वातावरणात विरोधकांवर टीकास्त्र डागलं आहे. अजित पवार, जयंत पाटलांसह संपूर्ण महाविकास आघाडीविरोधात त्यांनी मिश्किल टीप्पणी केली. पहाटेचा शपथविधीसह घटनाबाह्य विरोधी पक्षनेते, चहापान, जाहिरातींवरील खर्चांवर त्यांनी भाष्य केलं.

## मनसे नेते देशपांडेंवर स्टम्प आणि रॉडने हल्ला

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांच्यावर हल्ला झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. संदीप देशपांडे शुक्रवारी पहाटे मॉर्निंग वॉकसाठी गेले असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. संदीप देशपांडे यांना रॉड आणि स्टम्पच्या साहाय्याने मारहाण करण्यात आली. यामध्ये संदीप देशपांडे यांना किरकोळ दुखापत झाली आहे. त्यांना उपचारासाठी तातडीने हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या हाताला आणि पायावर स्टम्पचा फटका बसल्याने दुखापत झाली आहे. मात्र, त्यांची प्रकृती स्थिर आहे. हल्लेखोर कोण होते, याची माहिती अद्याप मिळू शकलेली नाही. हल्लेखोरांच्या तोंडावर मास्क होते. त्यामुळे त्यांची ओळख पटू शकलेली नाही. या घटनेनंतर पोलिसांनी वेगाने तपासाला सुरुवात केली आहे.



संदीप देशपांडे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी शिवाजी पार्कमध्ये गेले होते. ते एकटेच होते. त्यावेळी शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर चार ते पाच लोक बसले होते. त्यांच्या तोंडावर मास्क होते. या टोळक्याने संदीप देशपांडे यांच्यावर स्टम्प आणि लोखंडी रॉडच्या साहाय्याने हल्ला चढवला. टोळक्यातील एकाने संदीप देशपांडे यांच्या डोक्यात स्टम्प घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा वार संदीप देशपांडे यांनी हातावर झेलला. या झटापटीत एक फटका त्यांच्या पायावर बसला. हा सगळा प्रकार पाहून आजूबाजूचे लोक संदीप देशपांडे यांच्या मदतीसाठी धावून आले.

# क्षमतेपेक्षा अधिक कामे घेऊन ठेवणाऱ्या मक्तेदारांना नवी कामे नाहीत: आयुक्त

## मक्तेदारांना मुदतीत काम करणे बंधनकारक

सुराज्य/सोलापूर

महापालिका अंतर्गत विविध विकास कामे करणाऱ्या मक्तेदारांना यापुढे मुदतीत काम करणे बंधनकारक राहणार आहे. मुदतीत काम न करणाऱ्या मक्तेदारांना आता दंड आकारून मुदतवाढ देण्यात येईल, असे महापालिका आयुक्त शितल उगले यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या वतीने विविध विकासकामांचा मक्ता मक्तेदारांना दिला जातो मात्र ही कामे मुदतीत होणे गरजेचे आहे. त्यासाठी आता सर्व मक्तेदारांना मुदतीत काम करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुदतीत काम न केल्यास संबंधित मक्तेदारांवर दंड आकारण्यात येईल आणि त्यानंतरच मुदतवाढ देण्यात येईल, असे महापालिका आयुक्तांनी सांगितले. दरम्यान, काही मक्तेदार हे त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक कामे घेऊन ठेवतात, अशा मक्तेदारांना आता यापुढे नवी कामे मिळणार नाहीत. कराराप्रमाणे मुदतीत विकास कामे पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यासाठी अटी व शर्ती मध्ये बदल करण्यात येत आहे. यामुळे क्षमतेपेक्षा अधिक कामे बुक करून ठेवणाऱ्या मक्तेदारांना नवी कामे मिळणार नाहीत, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.



### डफरीन हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफी मशीन मिळणार

सोलापूर महापालिकेच्या डफरीन चौक येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसूती गृहात नवी सोनोग्राफी मशीन सीएसआर फंडातून उपलब्ध होणार आहे. यामुळे इथे चांगली व्यवस्था उपलब्ध होईल.

### २० व्हॅक्युम क्लिनर मशीन घेणार

सोलापूर शहर धूळमुक्त आणि प्रदूषण मुक्त करण्यासाठी महापालिक व्याक्युम क्लिनर मशीन सीएसआर फंडातून घेण्यात येणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.

# माढा नगरपंचायतीत विषय समितीच्या सभापतिपदांची निवड बिनविरोध

## सत्ताधारी काँग्रेसच्यावतीने पुन:श्च विद्यमान सभापतींना संधी

सुराज्य/माढा



माढा नगरपंचायतीच्या सभापती व सदस्यांच्या निवडी नुकत्याच पार पडल्या असून यामध्ये सत्ताधारी काँग्रेसच्या वतीने स्थायी समिती सभापती पदासाठी नगराध्यक्षा ॲड.मिनलताई साठे तर महिला बाल कल्याण समिती सभापती पदावरती उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे बांधकाम समिती सभापती पदी अरूण कदम पाणीपुरवठा सभापती पदी नितीन साठे तर आरोग्य समिती च्या सभापती पदी विकास साठे यांची फेरनिवड करण्यात आली.

संबधित सभापतींना आपल्या कार्यकालात केलेल्या चांगल्या कामाची पोहोचपावती म्हणून पुन्हा एकदा सर्वांची निवड करीत काम करण्याची संधी दिल्याने सर्व नूतन पदाधिकार्यांचे अभिनंदन केले जात आहे.

माढा नगरपंचायतीच्या विषय समिती व स्थायी समितीच्या सदस्यांच्या निवडीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २० फेब्रुवारी रोजी सूचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने चार विषय समित्या व स्थायी समितीच्या सभापतींची व सदस्यांची निवड करण्यात आली. स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नगराध्यक्षा डॉ.मिनलताई साठे यांची तर स्थायी समितीच्या सदस्यपदी अरुण वसंत कदम, कल्पना शिवाजी जगदाळे, नितीन हनुमंत साठे, विकास शंकर साठे यांची निवड करण्यात आली.यामध्ये सार्वजनिक बांधकाम नियोजन व विकास समिती सभापती अरुण वसंत कदम, सदस्य -सुनिता अजिनाथ राऊत, निर्मला रमेश थोरात, अर्चना आनंदराव कानडे यांची महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी कल्पना शिवाजी जगदाळे तर सदस्य रेश्मा सुधीर लंकेश्वर, मोहिनी अमोल नेटके, अनिता राजेंद्र चवरे यांची पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती सभापतीपदी नितीन हनुमंत साठे तर सदस्य म्हणून अजिनाथ भागवत माळी , वंदना मिलिंद लंकेश्वर, संजीवनी आनंद भांगे, यांची सार्वजनिक आरोग्य व वैद्यकिय समिती सभापतीपदी विकास शंकर साठे तर सदस्य म्हणून वंदना मिलिंद लंकेश्वर, शबाना मुन्ना बागवान, संगीता शहाजी साठे यांची निवड करण्यात आली. या निवडी माढ्याचे तहसीलदार तथा पिठासिन अधिकारी राजेश चव्हाण यांनी जाहीर केल्या. यावेळी माढा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी डॉ.चरण कोल्हे उपस्थित होते.

# महापालिकेच्या १०७५ कोटींच्या अंदाजपत्रकास प्रशासकांची मान्यता

**सोलापूर** : सोलापूर महापालिकेच्या सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३ - २४ च्या १ हजार ७५ कोटी १९ लाख ४ हजार ४०१ रुपयांच्या नियमित अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा म्हणजेच प्रशासकांनी मान्यता दिली आहे, अशी माहिती प्रशासक तथा आयुक्त शितल तेली उगले यांनी आज दिली.

### परिवहनच्या ५९ कोटीच्या अंदाजपत्रकास मंजुरी

परिवहन समिती यांनी सूचविलेल्या ५९ कोटी ३१ लाख ८२ हजार ६४१ रुपये (३५ बसेस) रुपये इतक्या एकूण जमा व खरच प्रशासकांनी मंजुरी दिली आहे, असेही महापालिका प्रशासक शितल तेली-उगले यांनी यावेळी सांगितले.





सोलापूर महापालिकेचे सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे नियमित अंदाजपत्रक हे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये स्थायी समितीकडे मंजुरीसाठी त्यानंतर सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव शिफारस करण्यासाठी २० फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आलेले होते. त्यास स्थायी समितीने फेर बदलासह सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर केलेले आहे. त्यास सर्वसाधारण सभेने म्हणजेच प्रशासकांनी शुक्रवारी मान्यता दिली आहे. महसुली जमा व महसुली खर्चाच्या एकूण रकमेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. भांडवली जमामध्ये महसुली निधीतून भांडवली कामासाठी वर्ग रक्कम या लेखाशिर्षाखाली तरतूद केलेली ४८ कोटी ३८ लाख रुपये मधून १० कोटी रुपये इतकी रक्कम कमी करण्यात आलेली आहे. ही रक्कम स्मार्ट सिटी मनपा हिस्सा या खर्चाच्या हेडमध्ये कमी केली आहे. स्मार्ट सिटी मनपा हिस्सा या हेडखाली सुचविणेत आलेली ३० कोटी रुपये ऐवजी २० कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात केली आहे. या भांडवली कामामधून कमी केलेली १० कोटी इतकी रक्कम पाणीपुरवठा विभागासाठी वर्ग करण्यात आलेली आहे.

एकूण अंदाजपत्रकीय १ हजार ७५ कोटी १९ लाख ४ हजार ४०१ रुपयांच्या रक्कमे मध्ये कोणताही बदल नाही, असे प्रशासक तथा आयुक्त शितल तेली-उगले यांनी यावेळी स्पष्ट केले. सर्वसाधारण सभेने म्हणजेच प्रशासकांनी या नियमित अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे दरम्यान डिसेंबर मध्ये यामध्ये ते सुधारित करता येईल, असे त्यांनी सांगितले.

# पर्ल गार्डनजवळ महापालिकेची जलवाहिनी पुन्हा फुटली

### नाल्यावरच जलवाहिनीला लावले फ्लो मीटर...

## स्काडा प्रणाली कामात बट्ट्याबोळ होत असल्याचा आरोप

सुराज्य/सोलापूर

स्मार्ट सिटी योजनेतून पाणीपुरवठा सुरळीत व नेटक्या पद्धतीने व्हावा या उद्देशातून करण्यात येत असलेल्या स्काडा प्रणाली अंतर्गत काम करताना पर्ल गार्डन जवळ दुसऱ्यांदा जलवाहिनी फुटली आहे. यामुळे लाखो लिटर पाणी शेजारील नाल्यात वाहत जात आहे.

नाल्यावरच जलवाहिनीला लावले फ्लो मीटर लावल्याने स्काडा प्रणाली कामात बट्ट्याबोळ होतो की काय असा सवाल उपस्थित होत आहे. सोलापूर स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शहरातील पाणीपुरवठ्याचे नेटके नियोजन करण्यासाठी काढा ही अत्याधुनिक प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे या प्रणालीचे काम १० फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आले आहे.

याच काळाप्रमाणे अंतर्गत महापालिकेच्या जलवाहिनीवर फ्लो मीटर बसविणे तसेच वॉल व बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. दरम्यान पर्ल गार्डन जवळ जलवाहिनीवर फ्लो मीटर लावण्याचे काम करण्यात येत आहे यादरम्यान येथील जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी नाल्यामध्ये वाहत जात आहे उन्हाळ्याच्या तोंडावरच शहरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आणि नेमकं या कामांतर्गत जलवाहिनी फुटली आहे त्यातच पर्ल गार्डन जवळील नाल्यावर ही जलवाहिनी जात असून नेमकं या ठिकाणीच फ्लो मीटर जलवाहिनीला बसविण्यात आले आहे पावसाळ्यात हा नाला वाहून जाताना या फ्लो मीटर द्वारे जलवाहिनीत नाल्याचे पाणी जाऊ शकते यामुळे प्रदूषित पाणी लोकांना पुरवठा होण्याची चिंता व्यक्त होत आहे. स्काडा प्रणाली कामाचा बट्ट्याबोळ होतो की काय असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, स्काडा प्रणाली अंतर्गत होणाऱ्या कामाकडे महापालिका आयुक्तांनी गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक त्या सूचना करण्याची गरज वर्तवली जात आहे.

### नेमकी माहिती घेऊन सूचना करण्यात येईल : आयुक्त

पर्ल गार्डन जवळील नाल्यावरून जलवाहिनी जाते आणि नेमके त्या ठिकाणीच फ्लो मीटर बसविण्यात आले आहे. पावसाळ्यात नाल्याचे पाणी या जलवाहिनीत जाऊ शकते, अशी शंका उपस्थित होत आहे. यासंदर्भात महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांना विचारले असता तांत्रिक माहिती घेण्यात येईल. त्यानंतर संबंधितांना सूचना करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.





आ.सुभाष देशमुख यांचा पुढाकार

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुग्णांना १३ लाखांची आर्थिक मदत

सुराज्य/सोलापूर

मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षाने रुग्ण सेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरामय आरोग्याचा प्रकाश आणला आहे. आमदार सुभाष देशमुख यांनीही यामार्फत गेल्या दोन महिन्यात १६ रुग्णांना तब्बल १३ लाखांची आर्थिक मदत मिळवून दिली आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने फेब्रुवारी २०२३ मध्ये विक्रमी १० कोटी २७ लाख रुपयांची वैद्यकिय मदत देण्यात आली आहे. आमदार सुभाष देशमुख यांचाही मोठा वाटा राहिलेला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व्यतिरिक्त राज्यातील धर्मादाय संस्था, वैद्यकिय उपचारासाठी मदत करणाऱ्या संस्था यांच्याशी संपर्क करून आ. सुभाष देशमुख यांनी मदत मिळवून दिली आह. आमदार देशमुख यांनी १६ रुग्णांना विविध आजारांबाबत तब्बल १३ लाखांची मदत मिळवून दिली आहे.

### रुग्णांच्या मदतीसाठी कायम प्रयत्नशील: आ. देशमुख

राज्यातील एकही सर्वसामान्य - गोरगरीब गरजू रुग्ण पैशाअभावी उपचाराविना राहणार नाही याची काळजी घ्या, असा आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला पहिल्या दिवशी दिला होता. त्यांच्या सुचनेचे तंतोतंत पालन करण्याचा आणि रुग्णांना दिलासा देण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न करत आहे, असे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले.

सोलापूर शहरासह जिल्ह्यातील विविध हॉस्पिटलमध्ये रुग्णांना व्यवस्थित उपचार व्हावेत यासह सवलत मिळवून देण्यासाठीही आमदार सुभाष देशमुख यांच्या संपर्क कार्यालयातून मदत केली जात आहे. रुग्णांनी आपल्या आजाराबाबत अथवा आर्थिक मदतीसाठी आ.सुभाष बापू देशमुख संपर्क कार्यालय, सह्याद्री हौसिंग सोसायटी, होटगी रोड सोलापूर येथे आरोग्य सहाय्यक यांच्याशी ७७२००९६४८८ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन आमदार देशमुख यांच्या संपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# गॅस सिलेंडरची दरवाढ सुरुच; 'आप'चे चुलीवर भाकरी करून आंदोलन

सुराज्य/सोलापूर

केंद्र सरकारने गॅस सिलेंडर भाव वाढ केली आहे. तब्बल पन्नास रुपये दरवाढ केल्याने गृहणीचे बजेट बिघडले आहे. यांच्या निषेधार्त आम आदमी पार्टी वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर चूल पेटवून भाकरी करण्यात करत या गॅस दरवाढीचा तीव्र शब्दात निषेध नोंदवण्यात आला.





गॅस दरवाढ रद्द झालीच पाहिजे, मोदी सरकार मुर्दाबाद, मोदी 'तेरी तानाशाही नहीं चलेगी, भ्रष्टाचार का एक ही काल केजरीवाल केजरीवाल अशी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. महिला पदाधिकारी अश्विनी गायकवाड यांनी मोदीचा निषेध करत केंद्रशासानावर आरोप केला. १०० रुपयात उज्वला गॅस कनेक्शन दिले मात्र एका गॅस मागे बाराशे रुपये मोदी सरकार घेत आहे. या सरकारला लाज वाटत नाही का? गॅस दरवाढी विरोधात आंदोलन करणाऱ्या स्मृती इराणी यांनी आता लाज सोडली का? ही दरवाढ तात्काळ रद्द झाली पाहिजे अन्यथा आम आदमी पार्टी पेटून उठेल असा इशारा दिला. एका गॅस सिलेंडरला बाराशे रुपये सर्वसामान्य माणूस कसा देऊ शकतो. महागाई कमी करू म्हणून सत्तेत आलेल्या मोदी सरकारने महागाई वाढवून सर्वसामान्यांच्या गळ्यावर पाय दिला आहे. आता जनतेला चुलीवर स्वयंपाक करण्याशिवाय पर्याय नाही त्याची दाहकता दाखवण्यासाठी आम आदमी पक्षाच्या वतीने आज आंदोलन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या आंदोलनात प्राजक्त चांदणे, जुबेर हिरापुरे, आनंद जाधव, गौतम सोनटक्के, हुसेन बागवान, एम आय गब्बूरे, जफार मदनी, अश्विनी गायकवाड, सुचित्रा वाघमारे, भारत अली, जैनुद्दीन शेख, अल्ताफ तांबोळी, निलेश संगेपाग यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गॅसचा भडका उडाल्याने तरुण जखमी

**सोलापूर** : काम करत असताना गॅसच्या पाईपचा लिकेज असल्याने पाईपचा अचानक भडका उडाल्याने भाजून तरुण जखमी झाला आहे. अनिल बिष्णोई (वय-२८, रा.जोधपूर सध्या संग्राम नगर, अकलूज) असे जखमी झालेल्या तरूणाचे नाव आहे.त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकित झाली आहे.

# अपघातात दुचाकीवरील तरूण जखमी

**सोलापूर** : दुचाकिवरून सांगोला ते नंदेश्वर येथे येत असताना सांगोला पासून ३ किलोमिटर अंतरावर वडेगाव गावा जवळ अपघात झाल्याने बाजीराव भिवा क्षीरसागर (रा.नंदेश्वर,मंगळवेढा) हा तरूण जखमी झाला आहे.त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दखल केले आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकित झाली आहे.

# महिलादिनी महापालिका देणार मुलींना सायकलींची भेट

**सोलापूर** : सोलापूर महापालिकेच्या सर्व शाळेतील आठवी आणि नववीच्या मुलींना महिला दिनानिमित्त सायकलींचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.

हा कार्यक्रम महापालिकेच्या कॅम्प यातील शाळेत ८ मार्च रोजी सकाळी आठ वाजता होणार आहे. मुलींना शाळेबद्दल आस्था निर्माण व्हावी आणि मुलींची गळती थांबावी यासाठी महापालिकेच्या वतीने शितल तेरी उगले यांच्या संकल्पनेतून यंदाच्या वर्षीपासून हा नवीन उपक्रम हाती घेण्यात येत आहे त्याची सुरुवात महिलादिनी होत आहे. या दिवशी महापालिकेच्या सर्व शाळेतील आठवी आणि नववीच्या मिळून २२७ मुलींना सायकली देण्यात येणार आहेत. या सायकली कोटक महिंद्रा बँक, पंजाब नॅशनल बँक यांच्या सीएसआर फंडातून देण्यात येणार आहेत याशिवाय सरकारचे प्रशासकिय सल्लागार प्रवीण सिंग परदेसी यांच्या मुलीनेही मराठी तब्बल एक लाख रुपयांची मदत केल्याची माहिती आयुक्त शितल तेली उगले यांनी दिली.

### कॅम्प शाळेसाठी आयसीआयसीआय बँक देणार सव्वा कोटी रुपये

महापालिकेच्या कॅम्प येथील शाळेच्या सुशोभीकरणासाठी आयसीआयसीआय बँक आपल्या सीएसआर फंडातून तब्बल सव्वा कोटी रुपये खर्च करणार आहे. याशिवाय शाळेत सर्व सुविधा युक्त प्रसाधन गृह उभारण्यासाठी एचडीएफसी बँक आपल्या सीएसआर फंडातून ८५ लाख रुपये देणार आहे.

पांगरी फटाका कारखाना स्फोट

# वारसांच्या मदतीसाठी २५ लाखांचा निधी जिल्हाधिकाऱ्यांच्या खात्यावर

सुराज्य/सोलापूर

बार्शी तालुक्यातील पांगरी येथील शोभेच्या दारूचे उत्पादन करणाऱ्या कारखान्याला आग लागून १ जानेवारी रोजी स्फोट झाला होता. त्या स्फोटात पाच कामगारांचा मृत्यू झाला.



त्या दुर्घटनेतील मृत कर्मचारी गंगाबाई सांगळे, मोनिका भालेराव, मीनाबाई मगर, सुमन जाधवर आणि कौशल्या बगाडे यांच्या वारसांना मानवतावादी दृष्टिकोनातून विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपये याप्रमाणे एकूण २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून, तो निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध झाला आहे. मुख्यमंत्री सहायता निधीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखेतून जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे असलेला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सोलापूर शाखेत २५ लाख रुपयांचा निधी परस्पर वर्ग करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी पाठविलेल्या अहवालातील यादीनुसार मृत व्यक्तींच्या कायदेशीर वारसांस आवश्यक ती संपूर्ण पडताळणी करुन मंजूर अर्थसाह्याचे वाटप करण्यात यावे, त्याचप्रमाणे अर्थसाह्य मंजूर प्रयोजनाकरिता वापरण्यात आल्याबद्दल विनियोगाचे प्रमाणपत्रदेखील सादर करावे, अशा सूचना मुख्यमंत्री सचिवालयाकडून जिल्हा प्रशासनाला करण्यात आल्या आहेत.

# पंढरपुरातील प्रकल्पांना निधी कमी पडू देणार नाही

## सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

सुराज्य/पंढरपूर

पंढरपुरातील नामसंकीर्तन आणि इतर विकास कामांना ३१ मार्च अखेर निधी मिळेल. कुठेही पंढरपूरचा विकासाला निधी कमी पडणार नाही. तसेच नमामि चंद्रभागा अभियानाबाबत ९०० कोटी निधीचे पुण्यात एसटीपी प्रकल्प उभे केले जात आहेत. याबाबत लवकरच पंढरपुरात देखिल शुद्धीकरण कामाला सुरुवात होत आहे. मध्यंतरी सरकारने लक्ष दिले नव्हते. आता मात्र नमामि चंद्रभागा अभियान पूर्ण होईल असे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



मुनगंटीवार शुक्रवारी विठ्ठल दर्शनासाठी आले होते. दर्शनानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना कसबा पोट निवडणुकित झालेल्या पराभवावर प्रतिक्रिया दिली. तसेच संजय राऊत यांनी भाजपवरील केलेल्या टीकेला उत्तर दिले. विजय झाला तर माजायचे नाही आणि हरलो तर लाजायचे नाही. ही आमची शिकवण असल्याने कसब्याच्या परभवाबाबत पक्ष विचार करत आहे.

मात्र पिंपरी चिंचवड येथे मतदारांनी अजित पवार यांना नाकारले आहे. संजय राऊत यांच्या मनाचे मांडे खूप असतात. त्यांना उद्धव साहेब पंतप्रधान होतील असे वाटल होते.. त्यामुळे ते भाजपवर टीका करतात हे त्यांच्या मनाचे खेळ आहेत. असे सांगत , गणपत वाणी विडी पिताना.... असे विडंबन काव्य मुनगंटीवार यांनी म्हणत खा. संजय राऊत यांची खिल्ली उडविली. तसेच विरोधक हरले तरी ईव्हीएम मध्ये घोटाळा असतो मात्र आता ते ईव्हीम बाबत काहीच बोलत नाहीत जेवढे फेविकॉलचे उत्पादन झाले आहे तेवढे यांच्या ओठाला लागले आहे. त्यामुळे ते ईव्हीएम बाबत बोलत नाहीत अशीही टीका यावेळी मुनगंटीवार यांनी केली.

### ठाकरे-राऊतांवर टीका

उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्या शिवतीर्थ वरील सभेला सुप्रीम कोर्टाने परवानगी दिल्यावर न्याय व्यवस्था चांगली आणि इतरवेळी लोकशाही आणि न्यायव्यवस्था धोक्यात असते, हे चुकीचे आहे, असा टोलाही त्यांनी ठाकरे गटाला लगावला.